रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १७ अंक २९०
www.ramprahar.com
गुरुवार, ८ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## पहलगाम हल्ल्याचा भारताने घेतला बदला
# ऑपरेशन सिंदूर
## पीओकेसह पाकिस्तानमध्ये घुसून नऊ दहशतवादी तळ केले उद्ध्वस्त



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याला भारताने चोख प्रत्युत्तर दिले आहे. भारतीय सैन्याने बुधवारी मध्यरात्री साधारणतः एक ते दीडच्या सुमारास ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला हादरा दिला. या धडक कारवाईत सुमारे १०० दहशतवादी मारले गेल्याचे सांगण्यात येत आहे. ऑपरेशन सिंदुरनंतर पाकिस्तानमध्ये मातम, तर भारतात जल्लोष केला जात आहे.**

ऑपरेशन सिंदूरद्वारे एकाच समन्वित हल्ल्याद्वारे नऊ दहशतवादी ठिकाणे नष्ट करण्यात आली. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संयुक्तपणे ही कारवाई केली. याबाबत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री, कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत माहिती दिली. या कारवाईत दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

२२ एप्रिल रोजी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये अंदाधुंद गोळीबार केला. २६ निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमावावा लागला होता. यामध्ये २५ भारतीयांचा समावेश होता. पहलगाम येथील भ्याड हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत बलदा घेतला. पाकिस्तानमध्ये घुसून दहशतवाद्यांना मारले.

भारतीय वायुसेना, नौदल आणि लष्कराने एकत्रितपणे ऑपरेशन सिंदूर यशस्वी केले. राफेल विमानांनी स्काल्प आणि हॅमर मिसाईल्सचा वापर करत पाकिस्तानात चार ठिकाणी आणि पीओकेमध्ये पाच ठिकाणी हल्ला केला. हे हल्ले भारतीय हद्दीतूनच करण्यात आले. त्यात पाकिस्तानी लष्करी ठिकाणांना टार्गेट केले नाही. हा सर्जिकल स्ट्राईक योग्य वेळ, मर्यादित, अचूक आणि गैर-आक्रमक असल्याचे सांगितले. या हलल्यांचे नियोजन, गुप्तचर माहिती, सॅटेलाइट फोटो आणि संनाद यंत्रणेवर आधारित होते.

भारताने केलेल्या या सर्जिकल स्ट्राईकमध्ये कुख्यात दहशतवादी मसूद अजहरच्या कुटुंबाचा खात्मा झाला आहे. याशिवाय अन्य कमांडर्स व दहशतवादी ठार झाले आहेत. त्यामुळे पाकिस्तानचे कंबरडेच मोडले आहे. लष्कराच्या या कारवाईचे देशभरातून स्वागत करण्यात आले आहे.

### देशासाठी अभिमानास्पद क्षण! -पंतप्रधान नरेंद्र मोदी



भारताच्या तिन्ही दलांनी मध्यरात्री ऑपरेशन सिंदूर अंतर्गत हवाई हल्ले करून नऊ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. यानंतर बुधवारी (दि. ७) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंत्रिमंडळाची बैठक घेतली. या बैठकीत मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना पंतप्रधान मोदींनी ऑपरेशन सिंदूरची माहिती दिली. पहलगाम हल्ल्याचा बदला घेतल्यानंतर पंतप्रधानांनी, हा देशासाठी अभिमानास्पद क्षण आहे, असे म्हटले.

*आपल्या सशस्त्र दलांचा अभिमान आहे. ऑपरेशन सिंदूर हे पहलगाममध्ये आपल्या निष्पाप बांधवांच्या क्रूर हत्येला भारताने दिलेले प्रत्युत्तर आहे. भारत आणि भारतीयांवर होणाऱ्या कोणत्याही हल्ल्याला योग्य उत्तर देण्याचा मोदी सरकारचा निर्धार आहे. भारत दहशतवादाला मुळापासून नष्ट करण्यासाठी दृढनिश्चयी आहे.*

**-अमित शाह,** केंद्रीय गृहमंत्री

## नक्षलवाद्यांवरही वार!
### तेलंगणाच्या सीमेवर २२ नक्षली ठार



**विजापूर : वृत्तसंस्था**

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याला भारताने प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे भारतीय लष्कराने जमीनदोस्त केले. दुसरीकडे याच काळात नक्षलविरोधी मोहिमेलाही मोठे यश आले. छत्तीसगड-तेलंगणाच्या सीमेवर नक्षलवादी आणि सुरक्षा जवान यांच्यात झालेल्या चकमकीमध्ये २२ नक्षलवादी ठार झाले आहेत.

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात नक्षलविरोधी मोहीम हाती घेण्यात आली आहे. परिसरात सुरक्षा जवानांकडून मोहीम सुरू असतानाच नक्षलवाद्यांसोबत चकमक झाली. यात २२ नक्षलवादी ठार झाले.

पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, कर्रेगुट्टातील डोंगरा भागात छत्तीसगड आणि तेलंगणाच्या सीमेवर २१ एप्रिलपासून मिशन संकल्प अभियान सुरू करण्यात आले आहे. याद्वारे नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यात येत आहे.

## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



(अधिक छायाचित्रे पान ३वर..)



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस बुधवारी (दि. ७) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, शकुंतला रामशेठ ठाकूर, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, अरुणशेठ भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिकांनी अभिवादन केले.

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते स्व. जनार्दन भगत यांच्यामुळे सर्वसामान्य माणसाला न्याय मिळाला. अहोरात्र समाजाची सेवा हाच त्यांचा उद्देश कायम राहिला. ८४ गावांचा न्याय निवाडा करीत असताना कोणावरही अन्याय होणार नाही याची त्यांनी सामाजिक भूमिकेतून काळजी घेतली. त्यांनी सर्व समाजासाठी आपले आयुष्य वेचले. स्व. जनार्दन भगत यांचा पुण्यतिथी कार्यक्रम शेलघर येथे झाला. या वेळी अनेक मान्यवरांनी स्व. भगतसाहेबांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करीत अभिवादन केले.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, संजय भगत, प्रकाश भगत, पांडुशेठ घरत, वसंतशेठ पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, जयवंत देशमुख, जयंत भगत, विश्वनाथ कोळी, सुभाष भगत, योगिता भगत, सुहास भगत, सुधीर ठाकूर, अरुण ठाकूर, अनुप भगत, विजय भगत, समीर भगत, रामचंद्र म्हात्रे, कृष्णा गोवंडी, संध्या मुंबईकर, निर्मला गोंधळी, हरेश म्हात्रे, कमलाकर देशमुख यांच्यासह ग्रामस्थांनीही अभिवादन केले.

## निवडक

### जम्मू, लेहसह देशातील १८ विमानतळे तात्पुरती बंद

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरनंतर खबरदारी म्हणून देशभरातील २००हून अधिक विमान उड्डाणे रद्द करण्यात आली, तर १८ विमानतळे तात्पुरती बंद ठेवण्यात आली आहेत. त्यात जम्मू, लेह, अमृतसर, चंदीगड, राजकोट, जोधपूर, जैसलमेर, शिमला, धरमशाला, जामनगर आदी विमानळांचा समावेश आहे. भारताच्या प्रमुख एअरलाइन्सने त्यांच्या उड्डाणांबाबत सोशल मीडियावर माहिती शेअर केली आहे.

### 'हिटमॅन' रोहित शर्माची कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती

**मुंबई :** भारतीय संघाचा नियमित कर्णधार



रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. हिटमॅन म्हणून ओळखला जाणाऱ्या रोहितने बुधवारी (दि. ७) सोशल मीडियावर पोस्ट करीत कसोटी क्रिकेटला रामराम ठोकला. रोहितने चाहत्यांनी दिलेल्या प्रेम व पाठिंब्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

## रायगडात अवकाळी पावसाच्या सरी



**अलिबाग : प्रतिनिधी**

उन्हाच्या असह्य झळांनी त्रस्त झालेल्या जीवांना सुखद वाऱ्याने दिलासा दिला, पण हा वारा वादळी असल्याने धडकी भरवणारादेखील ठरला. रायगडमध्ये मंगळवारी रात्री वादळी वाऱ्यासह काही भागात अवकाळी पावसाचा शिडकावा झाला. त्यानंतर बुधवारीही (दि. ७) काही ठिकाणी वाऱ्यासह पावसाच्या सरी बरसल्या. अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची धांदल उडाली.

मागील काही दिवस तापमानाचा पारा ३८.४० डिग्री सेल्सिअसपर्यंत पोहचला होता. तप्त उन्हाच्या झळा आणि अंगातून निघणाऱ्या घामाच्या धारांनी जीव हैराण झाला होता. दरम्यान, हवामान खात्याने उत्तर रायगडमध्ये अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला होता. तो अंदाज खरा ठरला.

मंगळवारी रात्री वादळी वाऱ्यासह विजा चमकू लागल्या, ढग गडगडू लागले. काही भागात दमदार पाऊस झाला, तर काही भागात केवळ शिडकावा झाला. बुधवारीही काही भागात सकाळी आणि काही भागात सायंकाळी पावसाने हजेरी लावली. या वेळी काळे ढग दाटून आले. वारादेखील वाहत होता. धुळीचे वादळ झाल्याने वाहनचालकांना मोठ्या शिताफीने वाहने चालवावी लागली. दरम्यान, या वादळी पावसाने आंबा आणि तोंडली पिकाची काही प्रमाणात हानी केली आहे.

## रेवदंड्यातील लाचखोर तलाठी, मंडळ अधिकारी जेरबंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील वसुंधरा धोंडू धुमाळ, (वय ५४) यांना पाच हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंध विभागाने रंगेहाथ पकडले. मंडळ अधिकारी विजय विश्वनाथ मापुसकर (वय ५७) यांनादेखील ताब्यात घेण्यात आले आहे.

तक्रारदार यांना अखत्यारपत्र दिलेल्या महिलेची आगरकोट येथे असलेल्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर वारस नोंद करायची होती. त्यासाठी मंडळ अधिकारी मापुसकर व तलाठी धुमाळ यांनी प्रत्येकी पाच हजार रुपयांची मागणी केली. तक्रारदारांनी नोंदवलेल्या तक्रारीनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून धुमाळ यांना लाच घेताना पकडले, तर मंडळ अधिकारी मापुसकर यांनी त्यांच्या लाचेची रक्कम नंतर आणण्याबाबत इशारा केला. दोघांनाही पुढील कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

## आदर्श शैक्षणिक संकुलात शनिवारी शिक्षण परिषद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथे शनिवारी (दि. १०) सकाळी १० वाजता नवीन शैक्षणिक धोरण २०२० संधी आणि आव्हाने या विषयांतर्गत शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र राज्य पदवीधर प्रकोष्ठ, आदर्श शैक्षणिक समूह संचालित श्री. बापूसाहेब डी.डी विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालय नवीन पनवेल आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद होणार आहे.

**अनेक मान्यवरांची लाभणार उपस्थिती**

देवद-विचुंबे येथील दादासाहेब श्री. धनराजजी विसपुते सभागृह आदर्श शैक्षणिक संकुलात होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्यसभेच्या खासदार मेधाताई कुलकर्णी यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, त्याचप्रमाणे उच्च शिक्षण विभागाचे विभागीय संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी, कोकण विभागाचे विभागीय महासंचालक डॉ. विजय नारखेडे, ज्येष्ठ विचारवंत प्रकाश पाठक, तज्ज्ञ मार्गदर्शक भाजप शिक्षक आघाडीचे संयोजक डॉ. प्रशांत कोल्हे, आंतरविद्या शाखेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चंद्रशेखर चक्रदेव उपस्थित राहणार आहेत.

याबाबत भारतीय जनता पक्ष पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक व आदर्श शैक्षणिक संकुलाचे चेअरमन धनराज विसपुते, संचालिका संगीता विसपुते, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्राचे संचालक डॉ. दयाराम पवार, श्री. बापूसाहेब डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्य ॲड. डॉ. सीमा कांबळे यांनी माहिती दिली.

## ऐन उन्हाळ्यात माथेरान हरवलं धुक्यात!



**माथेरान : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या अनेक भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली असताना माथेरान पर्यटनस्थळीदेखील या पावसाचा जोर पहावयास मिळाला. मंगळवार आणि बुधवार असे दोन दिवस पावसाच्या सरी बरसल्या. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. संपूर्ण माथेरान धुक्याच्या दुलईत हरवले असून पर्यटक येथील आल्हाददायक निसर्गात आणि थंडगार वातावरणात भटकंतीचा आनंद लुटत आहेत.

सध्या माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांची रेलचेल चांगलीच वाढलेली दिसत आहे. दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक या ठिकाणी दाखल होत आहेत. अवकाळी पावसाने येथे वातावरणात बदल निर्माण झाला असून हे पर्यटनस्थळ धुक्याच्या दुलईत हरवून गेलेले दिसत आहे. माथेरानमध्ये ७ मेपासूनच पावसाळी पर्यटन सुरू झाले की काय असे वाटू लागले.

आता सुट्यांचा हंगाम सुरू असून माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांचा ओघ दिवसेंदिवस वाढू लागला आहे. येथे दाखल झालेल्या पर्यटकांनी पावसात भिजण्याचा मनमुराद आनंद लुटला. पावसामुळे डोंगरमाथ्यावरील निसर्गसौंदर्यात झालेला बदल येणाऱ्या पर्यटकांना अधिक आकर्षित करीत असून येणारा प्रत्येक पर्यटक बेहद खुश होत आहे.

*आम्ही कुटुंबासोबत एक दिवसाकरिता माथेरानला आलो. येथील धुक्यात हरवलेले रस्ते, पॉईंट पाहून तर असं वाटलं की मिनी स्वित्झर्लंडला आलोय! पहिल्यांदाच माथेरान पाहिलं. प्रत्येकाने माथेरान पर्यटनस्थळी एकदा तरी भेट दिली पाहिजे.*

**-कैलास तनपुरे,** पर्यटक, मुंबई

### १०० दिवसांचा कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम
## कोकण विभागातील नऊ कार्यालयांचा राज्यस्तरावर गौरव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांचा गौरव करणारा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा नुकताच झाला. क्षेत्रीय कार्यालयांमध्ये कोकण विभागातील एकूण नऊ कार्यालयांची निवड गौरवासाठी करण्यात आली. या कार्यक्रमात राज्यभरातील विविध विभागांतील कार्यालयांनी दाखवलेली उल्लेखनीय कामगिरी ओळखून त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.




१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या क्षेत्रीय कार्यालयांच्या यादीत कोकण विभागीय आयुक्त कार्यालय यांना प्रथम क्रमांक मिळाला. कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला.

महानगरपालिका कार्यालयांच्या गटात उल्हासनगर महापालिकेने बाजी मारली. आयुक्त मनीषा आव्हाळे यांना प्रथम क्रमांक देऊन गौरविण्यात आले. याशिवाय नवी मुंबई आणि पनवेल महानगरपालिका यांनी तिसरा क्रमांक पटकावला. यासाठी अनुक्रमे आयुक्त डॉ. कैलास शिंदे आणि आयुक्त मंगेश चितळे यांना गौरविण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी गटात ठाणे जिल्हा परिषदेने बाजी मारली. मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन घुगे यांना प्रथम क्रमांक मिळवून दिला. त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाखाली जिल्हा परिषद कार्यालयाने प्रशासनात सुधारणा करत उल्लेखनीय प्रगती साधली.

पोलीस आयुक्तालय गटात मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय यांना प्रथम क्रमांक बहाल करण्यात आला. पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांचा यासाठी सन्मान करण्यात आला, तर परिक्षेत्र पोलीस उपमहानिरीक्षक गटात संजय दराडे (कोकण परिक्षेत्र) यांनी प्रथम क्रमांक मिळवला. पोलीस अधीक्षक गटात पालघरचे अधीक्षक बाळासाहेब पाटील यांना पहिल्या क्रमांकाने गौरवण्यात आले.

या पुरस्कार वितरण कार्यक्रमाद्वारे राज्य शासनाने प्रशासनातील उत्कृष्टतेला प्रोत्साहन दिले असून यामुळे कार्यपद्धतीत गती, पारदर्शकता आणि नागरिकाभिमुख सेवा देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाचे कौतुक करत यापुढील काळात आणखी व्यापक सुधारणा राबविण्याचे संकेत दिले.

# ‘सर्व भारतीयांकरिता अभिमानाचा दिवस’

**मुंबई ; प्रतिनिधी**

भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ऑपरेशन सिंदूर नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय लष्कर आणि पंतप्रधान मोदींचे आभार मानले.

भारतीय हवाई दलाने मध्यरात्री एअर स्ट्राईक करत पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिले. पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरच्या हद्दीत एअर स्ट्राईक करून नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले. या कारवाईनंतर संबंध देशभरातून समाधान व्यक्त केले जात आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या कारवाईवर आनंद व्यक्त केला असून भारतीय सैन्यदल आणि पंतप्रधान मोदींचे अभिनंदन व्यक्त केले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतीय हवाई दलाने एअर स्ट्राईक करत दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उध्वस्त केले आहेत. या कारवाईचे संपूर्ण शुटिंग करण्यात आले असल्यामुळे यावेळी कुणाला पुरावा मागण्याकरिता जागाच उरली नाही. मला असे वाटते की, सर्व भारतीयांकरिता अभिमानाचा असा हा दिवस आहे. आमच्यावर झालेला हल्ला भारत सहन करणार नाही. भारत योग्य पद्धतीने बदला घेईल, हे आपण दाखवून दिले आहे. ऑपरेशन सिंदूर हे नाव अधिक बोलके आहे, असे मला वाटते.

मध्यरात्रीनंतर म्हणजेच साधारणपणे दीडच्या सुमारास भारतीय हवाई दलाच्या फायटर जेट्स आणि राफेल विमानांनी पाकिस्तानमधील एकूण ९ ठिकाणी दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक केला. यात मोठ्या प्रमाणावर या दहशतवादी तळांचे मोठे नुकसान झाल्याचे भारताने स्पष्ट केले आहे.

# कर्जत तालुक्यात मंदिर फोडले, महिलेची सोनसाखळी चोरली

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात चोरीची घटना काही केल्या थांबताना दिसत नाही त्यातच या चोरट्यांनी आता नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील शेलू येथील मंदिर फोडून दान पेटीतील रोकड चोरून नेल्याची घटना घडली असून कर्जत पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या पळसधरी रस्त्यावरील महिलेला दुकानात खरेदीच्या बहाण्याने आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून पळून जाण्यास यशस्वी ठरले आहेत.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील मौजे शेलू येथील आर्या पॅराडाईज सोसायटी मधील उघडया असलेल्या सार्वजनिक गणेश मंदिरामध्ये ९ एप्रिल सायंकाळी ७. ०० वाजण्याचे सुमारास अज्ञात चोरट्यांने प्रवेश करुन मंदिरात असलेली स्टिलची दान पेटी फोडून त्यामधील तीस हजारांची रोकड चोरट्यांनी लंपास केली असून याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दखल करण्यात आला.

तर ५ मे रोजी कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील पळसदरी हाळ फाटा या राज्य मार्गावरील वर्णे येथील सी एन जी पंपासमोरील असलेल्या निशी कलेक्शन या जनरल स्टोअर मध्ये निशी मिलिंद साळुखे या असताना,मोटर सायकल वरून आलेल्या दोन चोरट्यांनी खरेदीच्या बहाण्याने निशी साळुखे यांना बोलण्यामध्ये गुंतवुन, त्यांच्या गळयातील २५ हजार रूपये किमतीचे सोन्याचे छोटे मंगळसुत्र व ४०. हजार रूपये किमतीची सोन्याच चेन एकूण ६५.हजार रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने हे जबरदस्तीने खेचून चोर पसार झालेत.

# अवकाळी पावसामुळे कोकणातील आंबा पीक धोक्यात



**अलिबाग: प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या बहुतांश भागात रात्री कमी अधिक प्रमाणात अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसाचा फटका आंबा पिकाला बसतो आहे. सध्या कोकणात शेवटच्या टप्प्यातील आंब्याचा हंगाम सुरू झाला आहे. पावसामुळे फळगळती बरोबरच आंबा खराब होण्याची शक्यता आहे. अवकाळी पाऊस झाला तर फळावर देठकुजवा किंवा फळामध्ये साकेची भीती आहे. यामुळे तयार झालेला आंबा लवकरात लवकर काढण्याची बागायतदारांची लगबग सुरू आहे.

हवामान खात्याने दिलेल्या इशारानुसार मंगळवारी रात्री रायगड जिल्ह्याच्या बहुतांश भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. महाड, माणगाव, गोरेगाव, म्हसळा पोलादपूर या दक्षिणेकडील भागात पावसाचा जोर अधिक होता. तर उत्तरेकडील पेण, खालापूर, अलिबाग तालुक्यातील काही भागात कमीअधिक प्रमाणात पाऊस झाला. ढगांचा गडगडाट आणि वीजेच्या लखलखाटासह झालेल्या पावसाने बराचकाळ वीज पुरवठा खंडित झाला होता.

या अवकाळीचा सर्वाधिक फटका आंबा बागायतदारांना बसला आहे. सोसाट्याच्या वार्यामुळे मोठ्या प्रमाणावर फळगळती झाली आहे. शिवाय पावसामुळे आंब्यावर देठकुजव्याचा प्रादुर्भाव होण्याची भीती आहे. शिवाय फळात साका पडू शकतो असे बागायतदारांचे म्हणणे आहे. पुढील दोन दिवस अवकाळीचा अंदाज वर्तवण्यात आल्याने बागायतदार चिंतेत आहेत. तयार झालेली फळे काढून सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू झाले आहेत. फळे झाडावरून काढून नुकसान टाळण्यासाठी धडपड सुरू झाली आहे. यावर्षी रायगड जिल्हयात आंब्याचे उत्पादन दरवर्षीच्या तुलनेत कमी आहे त्यातच अवकाळी पावसाने नुकसान वाढवले आहे.

पावसाने जिल्हयाच्या सर्वच भागात कमीअधिक प्रमाणात हजेरी लावली. यामुळे ग्रामीण भागातील वीट भटटयांचे थोड्याबहुत प्रमाणात नुकसान झाले आहे. रायगड जिल्ह्यात तयार होणारया वीटा मोठया प्रमाणात मुंबई नवी मुंबई परीसरात पुरवल्या जातात. इथल्या वीटांना तेथे मोठी मागणी आहे. कच्च्या वीटा पावसात भिजल्याने त्यांचा चिखल झाला आहे. हे आपले नुकसान कसे भरून काढायचे असा प्रश्न मालकांना पडला आहे.

> **अवकाळी पावसाने नुकसान झाल्याचा अहवाल अद्याप तरी प्राप्त झालेला नाही. मात्र स्थानिक पातळीवर नुकसान झाले असेल तर पंचनामा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अहवाल आल्यानंतर नुकसानीची स्पष्टता येवू शकते.**
> **– वंदना शिंदे,**
> **जिल्हा कृषी अधिक्षक**

# ऑपरेशन सिंदूरनंतर भाजप युवा मोर्चातर्फे माणगावमध्ये आनंदोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

ऑपरेशन सिंदूर नंतर भाजप युवा मोर्चातर्फे दि. ७ मे रोजी माणगावमध्ये आनंदोत्सव साजरा करण्यात आला. फटाके फोडून आणि पेढे वाटून केला आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी पाकिस्तान विरोधी घोषणांबरोबर भारताचा जयघोष करून सेनादलाचा देखील जयजयकार करण्यात आला.



भाजपा युवक जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, शिवसेना शहर प्रमुख प्रसाद धारिया, भाजपा प्रदेश चिटणीस यशोधरा गोडबोले, सामाजिक कार्यकर्ते विक्रांत गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस युवानेते सिद्धांत देसाई, सारिका मेहता, दिक्षा देसाई,युवा मोर्चा सरचिटणीस अमोल पवार, भाजप तालुकाध्यक्ष परेश सांगले माजी उपसरपंच स्वप्नील सकपाळ, उमेश यादव, भाजपा तालुका उपाध्यक्ष महादेव कदम, सुरज कडू, ओमकार गायकवाड, समीर पवार, अनिकेत साळुंखे, किशोर झेमसे, मिलिंद शेलार व माणगांवकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे म्हणाले की, पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचा संपूर्ण देशात निषेध करून दहशतवाद्यांना योग्य शासन झाले पाहिजे, अशी मागणी करण्यात आली होती. त्याच पार्श्वभूमीवर मध्यरात्री भारतीय सैन्यांनी एअर स्ट्राईक करून प्रत्युत्तर दिले आहे

## लोक अदालतीतून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची वीज ग्राहकांना संधी

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण परिमंडलातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित करण्यात आलेले ग्राहक तसेच वीजबिलाबाबत वाद आणि वीज चोरीच्या दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. संबंधित ग्राहकांनी तालुका न्यायालय स्तरावर शनिवारी (१० मे) आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन आपापली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

कल्याण परिमंडल कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुका न्यायालयात १० मे रोजी सकाळी ११ ते दुपारी दोन दरम्यान राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. अदालतीत सहभागी होण्याबाबत विधी विभागाकडून नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत.

# नवी मुंबई पालिकेच्या मुख्यालयात झाड कोसळून वाहनांचे नुकसान

**नवी मुंबई :** दोन दिवस अवकाळी पावसाने महाराष्ट्रात हाहाकार माजवला आहे. नवी मुंबईत देखील अतिवृष्टी होत आहे. तर सोसाट्याचा वारा वाहत आहे. त्याचे परिणाम शहरता जाणवू लागले आहेत. अनेकठिकाणी झाडे तर अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या कोसळत आहेत. त्याचा फटका खुद्द नवी मुंबई महापालिका मुख्यालयाला बसला आहे. मुख्यालयात कार पार्किंग असलेल्या ठिकाणी झाडाची मोठी फांदी कोसळून दोन चारचाकी वाहनांचे नुकसान झाले.

नवी मुंबई पालिकेने शहरातील झाडांची छाटणी करण्यास अद्याप सुरुवात केलेली नाही. मात्र अवकाळी लक्षणे व सोसाट्याच्या वाऱ्याने फांद्या कोसळल्याचे दिसून येत आहे.



हे नागरिकांसाठी धोकादायक ठरण्याची शक्यता आहे. खुद्द पालिका मुख्यालयात फांद्या कोसळल्याने वाहनांचे नुकसान झाले. यात त्यांनी ह्युंडाई कंपनीच्या गाडीवर झाडाची फांदी कोसळल्याने गाडीचा वरील भाग चेपला गेला. तर त्या शेजारी असलेल्या पांढऱ्या रंगाच्या कारवर देखील फांदी पडुन नुकसान झाले

# नमुंमपा शाळेतील विद्यार्थ्यांचे विशेष क्रीडा प्रशिक्षण शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने शिक्षण विभागाच्या सहकार्याने नवी मुंबई महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीमध्ये विविध खेळ तसेच खेळामधील बारकावे शिकता यावेत याकरिता विविध खेळांच्या विशेष क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.



महापालिका शाळेमधील विद्यार्थ्यांना कबड्डी, खो-खो, तायक्वांदो व फुटबॉल या खेळांची मोठ्या प्रमाणात आवड असल्याने व त्यामध्ये गती असल्याने त्यांना या खेळाबाबत तंत्रशुद्ध माहिती मिळावी व शास्त्रशुध्द प्रशिक्षण लाभावे याकरिता सदर उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पमध्ये ४ क्रीडा प्रकारांतील तज्ज्ञ व अनुभवी क्रीडा मार्गदर्शकांकडून खेळातील बारकावे शिकायला मिळत असल्याने त्याचा फायदा नमुंमपा शाळेतील विद्यार्थ्यांना नक्कीच मिळणार आहे व याचा उपयोग महानगरपालिकेची क्रीडा क्षेत्रातील कामगिरी उंचाविण्यासाठी होणार आहे.

या प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष लाभ कबड्डी खेळासाठी ३१, खो-खो साठी २८ व तायक्वांदोसाठी ८९ तसेच फुटबॉल खेळासाठी ८६ अशाप्रकारे एकूण २३४ मुले व मुली घेत आहेत. या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या वतीने प्रशिक्षणाच्या ठिकाणी सकस नाश्ता तसेच टी- शर्ट आणि शॉर्ट पॅन्ट अशा खेळाचा पोशाख देण्यात आला आहे.


२ मे पासून सुरू झालेले हे शिबीर १५ मे पर्यंत सकाळी ७.ते ९. या वेळेत संपन्न होत असून प्रत्येक खेळाकरिता ०२ अनुभवी प्रशिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या प्रशिक्षकांसोबत क्रीडा विभागातील मार्गदर्शक तसेच प्रशिक्षकही मदत करत आहेत.

# अशोक जोशी यांनी केले मरणोत्तर नेत्रदान

**खालापूर , चौक : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील श्री समर्थ नगर येथे राहणाऱ्या अशोक जगन्नाथ जोशी वय ८५ यांचे ६ मे रोजी सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. आयुष्यभर सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अशोक जोशी यांनी मरणोत्तर नेत्रदान करण्याची इच्छा त्यांच्या कुटुंबियानी पुर्ण केली.





आयुष्यभर सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अशोक जोशी यांनी मरणोत्तर नेत्रदान करण्याची इच्छा आपले चिरंजीव अमित जोशी, कन्या अर्चना आणि जावई विवेक पिटकर यांना बोलून दाखवल्याची माहिती डॉ. रणजीत मोहिते यांना समजली. त्यांनी हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर आणि लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे अल्पेश शहा यांच्याकडे जबाबदारी सोपवली. सर्व तांत्रिक निकष पूर्ण केल्यानंतर लक्ष्मी आय हॉस्पीटल - पनवेल येथील नेत्रतज्ञ श्री पार्वती हॉस्पिटल, खोपोली येथे आले आणि त्यांनी सर्वांच्या सहकार्याने नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण केली.

दिवंगत अशोक जोशी यांची नेत्रदानाची अंतिम इच्छा आपण पूर्ण करू शकलो याचे मनस्वी समाधान लाभल्याची भावना अमित जोशी आणि अर्चना पिटकर यांनी या निमित्ताने व्यक्त केली.

# आय लव बेलघर बोर्डाने गावाला नवा लूक!

**तळा : प्रतिनिधी**

बेलघर येथे गार्डन आणि सेल्फी पॉईंटचा आय लव बेलघर नावाचा शुभारंभ माजी समाजकल्याण सभापती गिताताई जाधव यांच्या हस्ते करण्यात आला

बेलघर येथे वर्धापन व पालखी सोहळ्याच्या निमित्ताने ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द हद्दीतील बेलघर येथे गार्डन आणि सेल्फी पॉईंटचा शुभारंभ माजी समाजकल्याण तसेच महिला बाल कल्याण सभापती रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्या हस्ते झाले.




यावेळी अँड.उत्तम जाधव,चरईखुर्द सरपंच प्रविण आंबार्ले,जिल्हाध्यक्ष किशोर शिंदे ,परशुराम कदम, माजी सरपंच पढवण चरई खुर्द सदस्य अजय सावंत, रश्मी आंबार्ले, सुभाष खिडबीडे, ग्रामविकास अधिकारी राजेश खैरे, बेलघर मुंबई अध्यक्ष सहादेव साळुंखे, बेलघर ग्रामीण अध्यक्ष सुरेश दाभेकर, बेलघर महिला मंडळ अध्यक्ष सौ. तारामती साळुंखे तसेच समस्त बेलघर ग्रामस्थ व मुंबईकर उपस्थित होते .

# महापारेषणच्या कार्यकारी संचालकपदी सुचिता भिकाने

**मुंबई: प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) कार्यकारी संचालकपदी (मानव संसाधन) अतिरिक्त जिल्हाधिकारी सुचिता भिकाने यांची नियुक्ती करण्यात आली. श्रीमती भिकाने यापूर्वी कोकण भवन येथे उपायुक्त (भूसंपादन) या पदावर कार्यरत होत्या.



श्रीमती भिकाने यांनी पुण्यातील कृषी महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण घेतले असून दापोलीच्या कोकण कृषी विद्यापीठातून पदव्यूत्तर शिक्षण घेतले आहे. तसेच त्यांनी विधी शाखेची पदवीही घेतली आहे. २०१० मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून उपजिल्हाधिकारी म्हणून शासकीय सेवेत रूजू झाल्या.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उत्कृष्ट काम केल्याचा त्यांच्याकडे दांडगा अनुभव आहे. सांगलीमध्ये रोजगार हमी योजना, जलयुक्त शिवार अभियान व शतकोटी वृक्ष लागवडीमध्ये त्यांनी मुख्य योगदान दिले आहे. त्यांना उपजिल्हाधिकारी पुरस्काराने ही गौरविले आहे.

## दुखवटा

### डॉ. सुनील मराठे



**माणगाव :** येथील सुप्रसिद्ध दंतरोग तज्ञ कै. डॉ.सुनील मराठे यांचे मंगळवार दि. ६ मे २०२५ रोजी दुपारी ३:१५ वा. पुणे येथे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय - ५९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुलगे असा परिवार आहे. त्यांच्यावर माणगाव येथील स्मशानभूमीत बुधवार दि. ७ मे रोजी सकाळी ९:३० वा. अंत्य संस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार दि. १५ मे रोजी माणगाव स्मशानभूमी येथे तर उत्तरकार्य विधी रविवार दि.१८ मे २०२५ रोजी राहते घरी निजामपूर रोड - माणगाव येथे होणार आहे.

### मधुशेठ म्हात्रे



**खारेपाट :** पेण तालुक्यातील डोलवी येथील सरपंच परशुराम म्हात्रे व पंचायत समिती सदस्य प्रदीप म्हात्रे यांचे वडील मधुशेठ म्हात्रे ( वय ६८ ) यांचे अल्पशा आजाराने दिनांक ६ मे रोजी निधन झाले. यांच्या अंत्ययात्रेला आमदार रवीशेठ पाटील ,रायगड जिल्हा परिषद माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव अॅड प्रवीण ठाकूर उपस्थित होते यांच्या पश्चात चार मुले एक मुलगी असा परिवार आहे.

## निवडक

### पनवेलमधून रिक्षाची चोरी

**पनवेल :** शहरातील विनम्र हॉटेलसमोरील रस्त्यावर उभी करून ठेवलेली ७० हजार रुपये किमतीची रिक्षा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेण्याची घटना घडली आहे. राम कुमार सरोज (वय ४० रा.शिळफाटा) यांनी त्यांची काळी पिवळी रिक्षा (एमएच ०४ एफसी ६५१२) ही विनम्र हॉटेल समोरील रस्त्यावर उभी करून ठेवलेली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ती रिक्षा चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पळस्पे येथून दागिन्यांची चोरी

**पनवेल :** राहत्या घरातून कोणीतरी अज्ञात इसमाने सोन्याच्या दागिन्यांची चोरी कल्याची घटना पळस्पे येथे घडली आहे. सुरेश गायकर यांच्या राहत्या घरातून अज्ञात चोरट्याने जवळपास विविध प्रकारचे नऊ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ज्वेलर्सच्या दुकानात चोरी

**पनवेल :** शहरातील विनायक ज्वेलर्स या दुकानात आलेल्या एका बुरखाधारी अज्ञात महिलेने हातचलाखीने सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याची घटना घडली आहे. ती महिला या दुकानात येऊन तिने सोन्याच्या कडा दाखवण्यास सांगून नंतर हातचलाखीने जवळपास दोन लाख रुपये किमतीचा सोन्याचा कडा हा तिच्या कडील बाजूस हाताच्या बोटाने ढकलून तो बुरख्या वरती पडल्यावर तो बुरख्याच्या खिशामध्ये घालून ती निघून गेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# उरणमध्ये मॉक ड्रिल यशस्वी

## जनतेने केले प्रशासनाला सहकार्य

**उरण : बातमीदार, वार्ताहर, प्रतिनिधी**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्व राज्यांना अलर्ट राहण्याच्या सूचना दिलेल्या होत्या तसेच भारतातील अतिमहत्त्वाच्या १६ ठिकाणी मॉक ड्रिल आयोजित करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील उरणमध्ये सायरन वाजवून मॉक ड्रिल घेण्यात आले.





केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्जता तपासण्यासाठी ऑपरेशन अभ्यास या मॉक ड्रिलचे आयोजन उरण येथे ७ मे २०२५ रोजी दुपारी ४ वाजता करण्यात आले होते. या मॉक ड्रिलदरम्यान दुपारी ४ वाजता नागरी संरक्षण दलाचे सायरन वाजवून नागरिकांना धोक्याचा इशारा देण्यात आला. उरण शहरातील तहसील कार्यालय उरण, ओएनजीसी कॉलनी, ग्रुप ग्रामपंचायत चाणजे, जिटीपीएस कंपनी बोकडविरा, बारमर लॉरी, भेंडखळ, ऑल कार्गो कंपनी कोप्रोली, बल्क गेट कंपनी मोरा या ठिकाणी सायरन वाजविण्यात आले. तर एन.आय. स्कूल, पंचायत समिती, उरण येथे आग लागल्याच्या बनावावर आधारित मॉक ड्रिल झाली. नागरी संरक्षण दल, वैद्यकीय पथक व इतर आपत्कालीन सेवांकडून बचावकार्य, शोध मोहिमा व नागरिकांसाठी मार्गदर्शन करण्यात आले.

केंद्रीय गृह विभागाच्या सूचनेनुसार उरण शहरात ब्लॅक-आऊट प्रकियेचीची रंगीत तालीम ७ मे २०२५ रोजी रात्री ८ वाजता घेण्यात आली असून त्यादरम्यान उरण शहरातील विद्युत पुरवठा १० मिनिटांसाठी खंडित केला गेला. त्यादरम्यान नागरिकांनी घरातील इन्व्हर्टर, जनरेटर व प्रकाश निर्माण करणारी रिचार्जेबल उपकरणे आदी वस्तूंचा वापर करणे टाळले.

एन आय हायस्कूल येथे मॉक ड्रिल करण्यात आले. त्या वेळी खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, न्हावा शेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलीस उपायुक्त डॉ विशाल नेहूल, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक समीर जाधव, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, उरण नगर परिषद माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, माजी नगरसेवक रवी भोईर, कौशिक शाह, नवीन राजपाल, सहाय्यक उपनियंत्रक उरण चे शशिकांत शिरसाट, नोडल अफिसर आपदा मित्र जिल्हा एम.के.म्हात्रे, तहसीलदार उद्धव कदम, मोरा पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक सूर्यकांत कांबळे, इंडियन आर्मीचे अधिकारी सन्नी राणा, एनसीसीचे ट्रेनिंग ऑफिसर संजय पाटील, कॅप्टन आर एस जमनुके, फायर ब्रिगेडचे अधिकारी कर्मचारी, आरोग्य विभागाचे अधिकारी कर्मचारी आदी उपस्थित होते.

**उरण हे केंद्रबिंदू आहे. अनेक महत्वाचे प्रकल्प येथे आहेत. त्यामुळे येथील सुरक्षा महत्वाची आहे. आलेल्या कोणत्याही परिस्थितीला उरणकर सज्ज आहेत. कोणतेही परिस्थिती येऊ दे उरणकर लढ्याला सामोरे जायला तयार आहेत. देशासोबत चालायला उरणकर सज्ज आहेत हे या मॉक ड्रिलमधून सिद्ध झाले आहे. आम्ही नेहमी देशासोबत आहोत.**
**-महेश बालदी, आमदार, उरण विधानसभा मतदारसंघ**

## नवीन पनवेलमध्ये मोफत एआय प्रशिक्षण सेमिनार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बौद्ध समाजाच्या तरुण-तरुणींसाठी नवीन पनवेल येथे शनिवारी (दि.१०) मोफत एआय (artificial intelligence) प्रशिक्षण सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या (आयएएस) मार्गदर्शनाखाली हे सेमिनार होणार आहे.

नवीन पनवेलमधील भीम प्रेरणा सांस्कृतिक केंद्र शबरी हॉटेलच्या पाठीमागे सकाळी १० वाजता होणाऱ्या सेमिनारमध्ये इंजिनिअरिंग, एमएससी, कॉम्पुटर सायन्स, मॅनेजमेंट, डिप्लोमा, आयटी, बीएससीआयटी आणि पदवीधर मुलांची आवश्यकता आहे.

ह्या सेमिनारमध्ये जवळ जवळ ४०० विद्यार्थी पनवेल व आजूबाजूच्या परिसरातून येणे अपेक्षित असून सेमिनारमध्ये हर्षदीप कांबळे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे आणि बरेच अधिकारी आणि एआयचे स्पेशालिस्ट मार्गदर्शन करण्यासाठी येणार आहेत, असे आयोजकांनी सांगितले आहे.

सेमिनार मध्ये येण्यापूर्वी नोंदणी आवश्यक असून त्यासाठी प्रदिप हिरामण अढांगळे (९०८२८३१६०१), प्रीती ताई आढाव (७९७७०९७४१२), शिवाजी साळवे (९१३७९८७४१८), कमलाकर साबळे (९९८७६०६३१८), किरण सोनवणे (७७७७०४६३००), राहुल वानखेडे (७७७७०४६३००), अविनाश अडागळे (९३२६२९९९४९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अवकाळी पावसाचा फटका; आगीसह वृक्ष उन्मळून पडले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये अचानकपणे मंगळवारी रात्री तसेच बुधवारी दुपारी अचानकपणे आलेल्या अवकाळी पावसाचा फटका शहरी भागासह ग्रामीण भागाला बसून काही ठिकाणी आगी लागण्याचे प्रकार तर काही ठिकाणी मोठमोठे वृक्ष उन्मळून पडले आहेत. अनेक ठिकाणी विद्युत पुरवठाही खंडित झाला होता.

बुधवारी करंजाडे ग्रामपंचायत ऑफिसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा सर्वर बॉक्सला आग लागली होती याची माहिती पनवेल महानगर पालिका अग्नीशमन दलाला मिळताच त्यांचे



पथक घटनास्थळी पोहचले या वेळी पाहणी केली असता असे निदर्शनास आले की, ग्रामपंचायतीमध्ये पहिल्या मजल्यावर असणाऱ्या कॅमेरा सर्वर बॉक्सला शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती. ही आग तेथील रहिवाशी यांनी पाणी मारून आग विझविली होती. या वेळी पथकाने पाहणी करून कोणताही धोका नसल्याची खात्री करून घेतली. दरम्यान, त्याचवेळी शहरातील किंग इलेक्ट्रॉनिक, तक्का जवळ झाड पडले असल्याची माहिती या पथकाला मिळताच ते परस्पर झाड पडल्याच्या ठिकाणी जाऊन पाहणी केल्या असता झाड रस्त्याच्या मधोमध पडलेले निदर्शनास आले.

या वेळी त्यांनी चैन सॉ कटरच्या सह्याने झाडाच्या फांद्यांचे बारीक तुकडे केले आणि रस्ता रहदारी करता मोकळा करून दिला. त्याचवेळी शहरातील काँग्रेस भवन येथे ट्रान्सफॉर्मवरला आग लागली आहे, अशी माहिती मिळतात सदर पथक वाहनांसह घटना स्थळी जाऊन पाहणी केली असता असे निदर्शनास आले की ट्रांसफार्मरच्या वोल्टेज बुशला आग लागली आहे. ठिकाणी करंट सप्लाय लाईन चालू असल्याने तेथील एमएससीबीचे कर्मचाऱ्यांनी करंट सप्लाय लाईन बंद केली आणि आग विझवली.

## लिमये वाचनालयाचे तात्पुरते स्थलांतरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय या संस्थेच्या इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम नजिकच्या काळात सुरू होत असल्यामुळे सध्या फायनल प्लॉट नं २४४, हिरवे गुरुजी पथ, भाजी मार्केट जवळ, पनवेल येथे स्वतःच्या इमारतीत सुरू असलेल्या वाचनालयाचे १६ मे २०२५ पासून पनवेल उरण आगरी समाज मंडळाचे महात्मा ज्योतिबा फुले सभागृह तळमजला, आगरी समाज मंडळ रोड, लोकनेते दि.बा.पाटील शाळेसमोर, पनवेल येथे स्थलांतरण होत आहे. या निमित्त १६ मे २०२५ ते २२ मे २०२५ पर्यंत वाचनालयाचे कामकाज बंद राहील, याची वाचकांनी, सभासदांनी व संबंधितांनी नोंद घ्यावी व सहकार्य करावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी यांनी केले आहे.

## मोहोपाडा येथे ‘तिच्या मनाचिये गुंती’ संवाद कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, मोहोपाडा-रसायनी शाखा,ग्रुप ग्रामपंचायत मोहोपाडा व अक्षर मानव यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.६) मोहोपाडा ग्रामपंचायत सभागृहात ’तिच्या मनाचिये गुंती’ हा संवाद कार्यक्रम झाला.

ग्रामपंचायत अधिकारी(ग्रामसेवक) वैभव पाटील यांच्या हस्ते दिव्यात पाणी भरून शास्त्रीय पद्धतीने दीप प्रज्ज्वलन करून प्रारंभ करण्यात आला. ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, अक्षर मानव ग्रंथालय अध्यक्ष रोहिदास कवळे यांच्या हस्ते पुस्तके देऊन उपस्थितांचा सत्कार करण्यात आला. संवादक आरती नाईक ( राज्य कार्यवाह महिला विभाग महा. अंनिस) यांनी स्त्रीचा शरीर धर्म (मासिक पाळी), शारीरिक, मानसिक बदल आणि समजूतींचा गोंधळ, त्यातून कुटुंबात निर्माण होणारा विसंवाद, स्त्रीची प्रजनन संस्था,नवीन



जीव निर्मीतीत स्त्रीचे महत्त्व, तिचे कष्ट तसेच मासिक पाळीच्या वेळी कशी स्वच्छता ठेवावी, त्यासाठी वापरली जाणारी साधने आणि वापरून झाल्यावर नष्ट (डिस्पोजल) कशी करावी व मासिक पाळी जातानाची (मेनोपॉज) काळजी यांचा स्लाईड शोद्वारे शास्त्रीय माहितीच्या आधारे साधलेला संवाद सर्वांनाच भावला.

महिला व पुरूषांसाठी असलेल्या या संवाद कार्यक्रमास २१ महिला व पाच पुरूषांनी हजेरी लावली. या वेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मोहोपाडा-रसायनी आणि अक्षर मानव ग्रंथालय विभाग अध्यक्ष महाराष्ट्राचे रोहिदास कवळे, संवादक आरती नाईक राज्य महिला विभाग कार्यवाह, महाराष्ट्र अंनिस. ग्रामपंचायत प्रतिनिधी म्हणून कर्मचारी अस्मिता मालकर, स्नेहा खाने, दीपाली मानकामे उपस्थित होत्या तर सारिका कांबळे, वर्षा पाटील यांचीही उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच उमाताई मुंढे यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधूरी कांबळे यांनी केले. या हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेंद्र नाईक, प्राजक्ता कवळे (कार्यवाह महिला सहभाग महा. अंनिस, मोहोपाडा रसायनी) कुणाल जाधव (प्रधान सचिव महा. अंनिस, मोहोपाडा रसायनी) आणि इतर कार्यकर्त्यांनी खूप खूप मेहनत केली.







**पनवेल : थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त शेलघर येथील निवासस्थानी मान्यवरांनी स्व. भगतसाहेबांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करत त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन केले.**

## महा जॉबफेअरमध्ये ३५३३ विद्यार्थ्यांची मुलाखत

### २१७ विद्यार्थ्यांची तत्काळ निवड

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

रसायनी नजीकच्या शेडुंग येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठात ६ व ७ मे २०२५ रोजी झालेल्या महा जॉबफेअर २०२५ या रोजगार मेळाव्याला नोकरभरती साठी उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. या दोन दिवसीय मेळाव्यात विविध उद्योग क्षेत्रांतील नामवंत कंपन्यांनी सहभाग घेतला, ज्यात ३५३३ हून अधिक विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात आली आणि २१७ विद्यार्थ्यांची तत्काळ निवड करण्यात आली.

एकूण ६,७२३ विद्यार्थ्यांची नोंदणी झालेल्या या मेळाव्याने नवोदित उमेदवारांना रोजगाराच्या संधींसाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ प्रदान केले. बुधवारपर्यंत नोंदणीकृत कंपन्याः १०४ उपस्थित होत्या. या वेळी एकूण नोंदणीकृत विद्यार्थी: ६,७२३ होते.यात मुलाखत दिलेले



विद्यार्थी ३५३३ उपस्थित होते. या वेळी मुलाखतीत तात्काळ निवड झालेले विद्यार्थी २१७ असून दुसऱ्या फेरीसाठी निवड झालेले १५३४ पात्र आहेत. या मेळाव्यात तंत्रज्ञान, वित्त, विमा, रिटेल, ऑटोमोबाईल, ई-कॉमर्स इत्यादींनी सहभाग घेवून पिल्लई महाविद्यालय रसायनी, बिर्ला कॉलेज (कल्याण), एमजीएम कॉलेज (पनवेल), पिल्लई कॉलेज (पनवेल), एसआयईएस कॉलेज (नेरूळ), प्रसारणीधी सभा (लोणावळा), परुल युनिव्हर्सिटी, आणि सीकेटी कॉलेज (पनवेल) अशा नामवंत संस्थांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, ज्यामुळे उमेदवारांच्या गुणवत्तेत भर पडली.

या वेळी भरतीसाठी ॲक्सेन्चर, विप्रो, फ्लिपकार्ट, टेक महिंद्रा, कॅनरा बँक, श्रीराम लाइफ इन्शुरन्स, लेंसकार्ट, मारुती सुझुकी आणि रेवा टेक्नॉलॉजीज यांनी विविध पदांसाठी भरती केली. दरम्यान शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांचा सेतु विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य डॉ. केशरीलाल वर्मा यांनी यशाबद्दल सांगितले.

लेंसकार्ट आणि रेवा टेक्नॉलॉजीज यांनी रिटेल व तंत्रज्ञान क्षेत्रात भरती केली. मेळाव्यात केवळ मुलाखतीच नव्हे, तर कौशल्याधिष्ठित इंटर्नशिप्स व करिअर मार्गदर्शन सत्रांचे आयोजनदेखील करण्यात आले.

या यशस्वी आयोजनामागे कुलगुरू प्रा.डॉ. केशरीलाल वर्मा, अध्यक्ष प्रा. डॉ. प्रवीण गुप्ता, टीपीओ नारायण खर्जे, सदस्यसचिव डॉ. कल्पनाडभाडे, मुख्य सदस्य प्रा. डॉ. विकास कुमार, डॉ. अल्का पांडे, कार्यकारी समिती प्रमुख डॉ. महेंद्र इंगोळे आदी उपस्थित होते.

## पनवेल मनपा अधिकारी, कर्मचाऱ्यांतर्फे दिवंगत सहकाऱ्यांना श्रद्धांजली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या कार्यकर्तृत्वाने प्रचंड लोकप्रिय असलेले ज्येष्ठ सहकारी अधिक्षक कै. सदाशिव कवठे तसेच युवा सहकारी स्वच्छता निरिक्षक कै. राहूल मोकाशी यांच्या निधनाने पनवेल महापालिकेची मोठी हानी झाली आहे. अशा भावपूर्ण शब्दांत आज पनवेल महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वतीने आपल्या दिवंगत सहकाऱ्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व मौन बाळगुन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

पनवेल महापालिकेचे परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, स्वरुप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, मुख्य लेखापरिक्षक निलेश नलावडे, उपलेखापाल संजय जाधव, पालिका सचिव अक्षय कदम, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर तसेच पनवेल महानगपालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.





आदर्शवत व्यक्तिमत्व कै. सदाशिव कवठे शिक्षण, महसूल, करसंकलन आणि लेखा यांसारख्या महत्त्वपूर्ण विभागांमध्ये अत्यंत जबाबदारीने काम करून लोकाभिमुख झालेले कै. सदाशिव कवठे हे लोकप्रिय असे व्यक्तिमत्व होते. संस्थेप्रती त्यांची आपुलकी संस्थेप्रती असलेला त्यांचा आदरभाव तसेच सर्व सहकाऱ्यांसमवेत असलेला स्नेहभाव या खेरीज संस्थे बाहेरील व्यक्तींशी असलेले त्यांचे आत्मीयतेचे संबंध हेच त्यांच्या अपार लोकप्रियतेचे वैशिष्ट होते. त्यांच्या या कार्यगुणांचा विचार करून सर्वांनी तसे वागण्याचा प्रयत्न करावा हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल असे श्री मंगेश गावडे, डॉ. विधाते आणि सहकाऱ्यांनी या वेळी सांगितले.

स्वच्छता निरिक्षक म्हणून सोपावलेली जबाबदारी विनाविलंब व विनातक्रार सहजतेने पुर्ण करणारा एक युवा सहकारी म्हणजे कै. राहूल मोकाशी यांचे दुर्दवाने अपघाती निधन होणे ही बाब अजुनही मनाला पटत नाही. एक कर्तव्य भावना असलेला कर्मचारी आपण राहूलच्या रूपाने गमावला अश्या शब्दात त्यांच्या सहकाऱ्यांनी भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली. यावेळी झालेल्या शोकसभेत सर्वश्री अरुण कांबळे, अनिल कोकरे, अनिल जाधव, यांनी ही आपल्या शोक भावना व्यक्त करून उभयतांना श्रध्दांजली वाहिली.

# वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची जोरदार हजेरी

## नेरळमध्ये वीज पडून झाडाला लागली आग

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात रात्री वादळी वारा आणि नंतर अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्यावेळी विजांचा लखलखाट सुरू असताना नेरळ गावातील राजबाग गृहनिर्माण सोसायटीमधील एका झाडावर वीज कोसळली. त्या झाडावर वीज कोसळल्याने झाडाला आग लागली. त्या वेळी पाऊस सुरू असल्याने काही मिनिटात ती आग विझली.



कर्जत तालुक्याच्या सर्व भागात अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान केले असून रात्री दहा वाजण्याच्या सुमारास नेरळ गावातील पाडा भागात असलेल्या राजबाग गृहनिर्माण सोसायटी मधील एका इमारतीतील नंबर १४ चे बाजूला मिनी ट्रेन ट्रकचे बाजूला असलेल्या जुन्या नारळाच्या झाडावर ही वीज कोसळली. विज कोसळल्यानंतर त्या झाडावर आगीचे लोळ पडल्याचे दिसून आले. मात्र पाऊस सुरू असल्याने काही मिनिटात ही आग विझली.

तालुक्यातील पाथरज गावात राहणारे शेतकरी परशुराम गांधीवले यांच्या घराचे सुटलेल्या वादळी वाऱ्यामुळे छप्पर उडून घराचे मोठे नुकसान झाले असून त्यांच्यावर भिजत राहण्याची वेळ आलेली आहे. तालुक्यात या अवकाळी पावसाने,अंबा बागायतदार फळ पिकांचे तर वीटभट्टीधारकांचे मोठे नुकसान झाले आहे.

## खालापुरात होर्डिंगसह झाडे पडली; वीजपुरवठा खंडित

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली खालापूरसह तालुक्यातील वावोशी चौक रसायनी मधे जोरदार वाऱ्यासह पावसाच्या सरी बरसल्या सकाळी ११ वा सुमारास सोसाट्याच्या वाऱ्याने खालापूर नगरपंचायत कार्यालया समोरील भले मोठे होर्डिंग्ज कोसळून पडले तर झाडे उन्मळून पडली. तसेच झाडांच्या फांद्याही कोसळून पडल्याने नागरीकांची तारांबळ उडाली. दरम्यान मंगळवारी रात्री १० वा सुमारास वादळ वाऱ्यांसह जोरदार पाऊस बरसला. खालापूर मध्ये विज पुरवठा खंडित झाला होता.



## मान्सूनपूर्व तयारीसाठी खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांचा पाहणी दौरा

**खालापूर, मोहपाडा,चौक : प्रतिनिधी**

मान्सून पूर्व तयारीचे अनुषंगाने खालापूर तालुक्यातील दरड प्रवण गावांची स्थळ पाहणी करण्याकरीता कर्जतचे प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ यांचे मार्गदर्शनाखाली खालापूर तालुक्याचे तहसीलदार अभय चव्हाण यांनी संबधित अधिकार्यांसह भेट देउन पाहाणी केली



यावेळी त्यांनी खोपोली शहरातील काजूवाडी, सुभाष नगर, तसेच खालापूर तालुक्यातील बीड खुर्द, ताडवाडी या गावांना भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत खालापूर तालुक्याचे , सार्वजनिक बांधकाम खात्याचे उपविभागीय अभियंता प्रशांत राखाडे, खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज पाटील, सहा. पोलीस निरीक्षक मनोज ठाकरे, वनपाल भगवान दळवी, मंडळ अधिकारी भरत सावंत, संदेश पानसरे, माणिक सानप, खालापूर तालुका पंचायत समितीचे शैलेंद्र तांडेल, उपाधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाचे यतीराज खांडेकर, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, ग्रामसेवक आणि इतर अधिकारी उपस्थित होते. या भेटी दरम्यान स्थानिका गावकरी आणि नागरिकांसोबत उपाययोजना संदर्भात चर्चा करून संबंधित विभागाला तत्काळ कारवाई करण्याच्या सूचना केल्या.

## अवकाळी वादळाने शेड जमीनदोस्त

**चौक : प्रतिनिधी**

बिना परवानगी बांधलेली रस्त्यालगतची शेड बुधवारी सकाळी अवकाळी वादळाने पूर्णपणे कोसळून रस्त्याच्या मधोमध पडल्याने दोन्ही बाजूची वाहतूक थांबली आहे.यामुळे चौक वरून वाशिवली,वडगांव, माडप, इसांबे व परिसरातील गावात व औद्योगिक वसाहतीत जाणाऱ्या नागरिकांची मोठी अडचण निर्माण झाली होती.



बुधवारी सकाळी साधारण ११ वाजण्याच्या सुमारास चौक परिसरात वादळ वारा सुरू झाला,कमी प्रमाणात अवकाळी पाऊस सुरू होत असताना तुफान वादळ वारा सुरू झाला. ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव हद्दीत चौक वाशिवली मार्गावर, रस्त्याच्या कडेला असलेली एक शेड तुफान वाऱ्याने जमीनदोस्त झाली आहे, वारा एवढा तुफान होता की, ही शेड चौक वाशिवली रस्त्यावर मधोमध पडली, त्यामुळे चौक वरून वाशिवली,वडगांव, माडप, इसांबे व परिसरातील गावात व औद्योगिक वसाहतीत जाणाऱ्या नागरिकांची मोठी अडचण निर्माण झाली, त्याच त्याच भागातून चौक आणि परिसरात येणाऱ्या लोकांची अडचण निर्माण झाली आहे.

या बांधकामांचा अनधिकृत बांधकाम म्हणून पंचनामा करून तहसील कार्यालयात पाठविला असल्याचे तुपगाव ग्राम महसूल अधिकारी पालवे यांनी सांगितले, या शेडच्या बांधकामासाठी ग्राम पंचायत तुपगाव यांच्या कडे जमीन मालकांनी योग्य आणि संबंधित खात्याच्या परवानग्या घेऊन आमच्याकडे रीतसर अर्ज केला नाही, आम्हीच नोटीस देऊन ही अनधिकृत बांधकामे थांबविली असल्याचे सरपंच रवींद्र कुंभार यांनी सांगितले,

## भाजप अलिबाग तालुका दक्षिण मंडळ अध्यक्षपदी अशोक वारगे

**अलिबाग: प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी (भाजपा) अलिबाग तालुका दक्षिण मंडळ अध्यक्षपदी अशोक वारगे,मध्य मंडळ अध्यक्षपदी रोशन भगत व उत्तर मंडळाध्यक्षपदी चेतन. पाटील यांची निवड करण्यात आली .



भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाणयांच्या आदेशानुसार संघटन पर्वतीलमंडळ अध्यक्ष निवड करण्यासाठी मंगळवारी(दि.६) अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी हॉलमध्ये बैठक पार पडली. या बैठकीत भाजपा दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांनी निवड जाहीर केली.

भाजपा कोकण विभाग संघटन मंत्रीअभिजित पेनडणेकर,माजी आमदार पंडित पाटील,ज्येष्ठ नेते सतीश धारप, जिल्हा सरचिटणीस ॲड् महेश मोहिते, जिल्हा परिषद उपाध्यक्ष ॲड्. आस्वाद पाटील,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील,जिल्हा परिषद सदस्य चित्राताई पाटील,भाजपा उपाध्यक्ष सोपान जांभेकर,माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रियदर्शनी पाटील, तालुका अध्यक्ष उदय काटे, अलिबाग शहर अध्यक्ष ॲड् अंकित बंगेरा, संदीप घरत, सवाई पाटील, कार्यालय अध्यक्ष सतीश लेले,मंदाबळी,माणिक बळी, सरचिटणीस संकेत जोशी, महिला अध्यक्ष मनीषा पाटील, उपस्थित होते.

## चित्रकार रामदास लोभी यांच्या चित्रांचे मुंबईत प्रदर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**

सृजनशील चित्रकार म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणारे कर्जत तालुक्यातील बीड गावातील चित्रकार रामदास लोभी यांच्या चित्रांचे प्रदर्शन सध्या मुंबई मधील आर्टिस्ट सेंटर मध्ये हे प्रदर्शन सुरु असून 'भावनेचा अथांग सागर' असे शीर्षक या चित्र प्रदर्शनाला देण्यात आले असून हे चित्र प्रदर्शन १२ मे पर्यंत चालणार आहे.



कर्जत तालुक्यातील बीड या चोहोबाजूंनी निसर्गाने नटलेल्या गावातील चित्रकार रामदास लोभी यांनी मुंबईत आपले शिक्षण पूर्ण केले. चित्रकलेची विशेष आवड असलेल्या चित्रकार रामदास लोभी यांनी आतापर्यंत देशात आणि परदेशात देखील आपल्या चित्रांची प्रदर्शने भरविली आहेत. भावना, विचार आणि आत्म्याच्या शांत, गुंतागुंतीच्या प्रवाहाचं चित्रमाध्यमातून केलेलं सर्जनशील दर्शन हे चित्रकार रामदास लोभी यांच्या चित्रातून घडत असते.

## तळा तालुका खरीप हंगामपूर्व शेतकरी कार्यशाळा



**तळा –प्रतिनिधी**

तळा तालुक्यात खरीप हंगाम पूर्व शेतकरी कार्यशाळा ६ मे रोजी पंचायत समिती तळा डॉ . नानासाहेब धर्माधिकारी सभागृहामध्ये उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय माणगाव येथील कृषी अधिकारी रविशंकर कावळे यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी व्याख्याते म्हणून डॉ. राजेश मांजरेकर कृषी विज्ञान केंद्र रोहा हे उपस्थित होते.

सदर कार्यशाळेत तळा तालुक्यातील प्रतिष्ठित शेतकरी. शेतकरी उत्पादक कंपनी तसेच बचत गटांचे प्रतिनिधी, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजकता योजनेतील लाभार्थी, डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियानामधील सहभागी शेतकरी व इतर असे ६० शेतकरी उपस्थित होते शेती कार्यशाळेचे प्रस्ताविक तालुका कृषी अधिकारी श्री.कांबळे यांनी केले.

पाणी फाउंडेशन द्वारे डिजिटल शेती शाळा व गटशेतीचा पोवाडा याची चलचित्र फीत सर्व शेतकऱ्यांना दाखवण्यात आले. त्याचबरोबर मनुष्यचलित भातपुर्नलागवड. भात शेतीमध्ये अंतर मशागत व भात कापणी साठी यंत्रांचा वापर याबाबतचे व्हिडिओ दाखवण्यात आले. भात लागवड पद्धती चार सूत्री भात लागवड व इतर विषयांचे व्हिडिओची क्यूआर कोड तयार करून शेतकऱ्यांना सर्व व्हिडिओ मोबाईल मध्ये उपलब्ध करून देण्यात आले होते.

डॉक्टर मांजरेकर यांनी आंबा पुनर्जीवन व अननस लागवड याबाबत मार्गदर्शन केले कृषी अधिकारी कांबळे कृषी विभाग कोणकोणत्या योजना कशा प्रकारे राबवणार आहे याबाबत मार्गदर्शन केले कलिंगड आणि अननस लागवड आत्मा अंतर्गत बचत गटाच्या मार्फत राबवण्यात येणार असल्याचे सांगितले

## ऊर्जा देणारा खारघर महोत्सव

भारतीय जनता पक्ष, खारघर तर्फे महाराष्ट्र दिनानिमित्त विशेष भाजप सांस्कृतिक महोत्सव दिनांक १ ते ५ मे पर्यंत आमदार प्रशांतजी ठाकूर यांच्या संकल्पनेतून आयोजित केला गेला. हा कार्यक्रम खारघर वासीयांना एक जबरदस्त ऊर्जा देऊन गेला. शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाने नवीन पिढीला इतिहास मूल्ये कळली.प्रत्येक दिवसांच्या वेगवेगळ्या विषयांवरील कार्यक्रम एक से बढकर एक होता. कुठेही कसर दिसून आली नाही



या कार्यक्रमात पहिल्या दिवशी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक रत्नागिरी नाचने येथील पालखी सोहळा, आकांक्षा लावणी, कोळी नृत्य इत्यादी.

दुसर्या दिवशी गणेश वंदना, कुमारी साक्षीचा शिवाजीचा पोवाडा, स्थानिक कलाकारांची कथक नृत्य हृदयाला भिडणारी गाणी, तिसर्या दिवशी प्रथमेश लघाटे व मुक्ता वैशंपायन यांनी गायलेली सर्व प्रकारातील गाणी मनाला फारच आनंद देऊन गेली. श्री विघ्नेश जोशी यांचे निवेदन खुमासदार होते.

चौथ्या दिवशी स्पर्धेसाठी उतरलेले सर्वच ग्रुप डान्स कसदार होते त्यांना त्यांची कला साजरी करण्यासाठी एक जबरदस्त प्लॅटफॉर्म मिळाला आणि त्यांनी प्रेक्षकांची दादही घेतली. प्रत्येक दिवशी कार्यक्रमांचे शेवटी होणार्या लकी ड्रॉ ची सर्वजण उत्सुकतेने वाट पाहत असत. बक्षीस घेऊन जाताना त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा होता. प्रत्येक दिवशी निवेदन करणारे निवेदकांनी आपल्या अदाकारीने कार्यक्रमात रंग भरला होता. या कार्यक्रमातून महाराष्ट्राची कला संस्कृती व शिवाजी महाराज जाणता राजा नवीन पिढीला कळला. दिनांक १ ते ४ मे या चार दिवसात प्रत्येक दिवशी रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला

या कार्यक्रमांत शिवकालीन शस्त्र प्रदर्शन पाहिल्यावर सलाम शिवबाच्या नियोजनाला म्हणावे लागले .यातुन खारघरकरांना प्रचंड ऊर्जा मिळाली विविध प्रकारच्या मिसळ व इतर खाद्यामुळे प्रेक्षक अत्यंत तृप्त झाला. चवदार मिसळी व इतर खाद्य पदार्थामुळे प्रेक्षक तृप्त झाला. बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाने खारघरकर रिचार्ज झाला.

सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निवेदिकांची खुमासदार सालंकृतवाणी.म्हणजे कार्यक्रमाला खमंग फोडणीच म्हणावे लागेल धन्यवाद संस्कृतीच्या संकल्पनेला, धन्यवाद यशस्वी मॅनेजमेंटला. खारघर वाशीयांच्या वतीने आमदार प्रशांतजी ठाकूर तसेच सांस्कृतिक जिल्हा समन्वय अभिषेक पटवर्धन व त्यांच्या टीमंचे मनस्वी धन्यवाद .

**–अनिता अरविंद जाधव**, खारघर




**पनवेल महानगरपालिका**

ता.पनवेल, जि.– रायगड, पनवेल–४१०२०६.

जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.१९३/१९८/२०२५

**अग्निशमन विभाग**

**अंदाजिय दरपत्रक मागणी सूचना**

याद्वारे सर्व व्यावसायीक/कंत्राटदार...ई यांना सुचित करण्यात येते कि, मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडे नोंदनीकृत असलेल्या अनुज्ञाप्ती धारकांनी पनवेल महानगरपालिका मालकीच्या नाट्यागृह इमारातींचे अग्निशमन परिक्षण करूण याकामी येणाऱ्या खर्चाचे निव्वळ अंदाजीय दरपत्रक मागणी करण्यात येत आहे तरी याकामी ईच्छुकांनी आपले दर सादर करावेत सदर कामाचा तांत्रिक तपशिल www.panvelcorporation.com या सांकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर उपकरणाच्या अधिक माहितीकरीता मुख्यालय पनवेल अग्निशमन केंद्र येथे संपर्क साधावा.

दिनांक: – ०७/०५/२०२५

**सही/–**

उपायुक्त मुख्यालय (I)

पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

आमचे अशिल श्री. शैलेश सदाशिव फाटक व कै. इंदुमती सदाशिव फाटक (मयत) तर्फे वारस श्री. शैलेश सदाशिव फाटक, रा. वाघाचीवाडी, ता. पनवेल, जि. रायगड यांनी दिलेली माहिती, अधिकार व दाखवलेले कागदपत्रान्वये तमाम जनतेस असे कळविले जाते की,

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे वाघाची वाडी (पुर्वीचे मौजे – धोधाणी), तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे क्रमांक | क्षेत्रफळ चौ.मी. | आकार रू. पैसे. | भोगवटादार |
|---|---|---|---|
| ७/५ मधील बिनशेती भुखंड क्र. १०, उपभुखंड क्र. १ ते २ | १२.००.०० | १२०.०० | वर्ग–१ |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असे (सदरची मिळकत)

सदरची मिळकत ही आमचे पक्षकार श्री. शैलेश सदाशिव फाटक व त्यांच्या जनक आई कै. इंदुमती सदाशिव फाटक यांची स्वकष्टार्जीत नावे व ताबे कब्जातील मिळकत होती. त्यांच्या मृत्युनंतर सदरची मिळकत ही आमचे पक्षकार यांच्या ताबे व वहीवाटीत होत व आहे.

सदरची मिळकत ही आमचे आशिल हे विक्री करणार आहेत व तशी ठोस बोलणी सुध्दा संभाव्य खरेदीदारासोबत झालेली आहेत. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजारहित आहे. तथापी सदरच्या मिळकती अगर तिच्या भागाबाबत जर कोणी व्यक्ती, संस्था इ. यांचा काहीही हक्क हितसंबंध असेल किंवा सदरची मिळकत अगर तिच्या भागाबाबत आमचे आशिल यांचे पुर्वहक्कदार यांनी कोणतेही लेखी अगर तोंडी करार – मदार, दस्त ऐवज इ. केलेले असतील तर अशा व्यक्ती, संस्था इ. यांनी सदरची नोटीस प्रसिध्द् झालेपासून १४ दिवसात खाली दिलेल्या पत्यावर मुळ कागदपत्रासह लेखी हरकत नोंदवावी. तर मुदतीत हरकत नोंदवली नाही तर सदरची मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे आशिल संभाव्य व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकतींचा विचार केला जाणार नाही याची दखल घ्यावी. येणेप्रमाणे नोटीस असे.

पनवेल.

दिनांक : ०६/०५/२०२५.

**सही / –**

**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**

ॲडव्होकेट

शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

# नेरूळ रेल्वेस्थानकात भिकारी, बेघरांचा वावर

## कारवाई करण्याची मागणी

नवी मुंबई : प्रतिनिधी

नेरूळ रेल्वे स्थानकात दिवसा व रात्रीच्या वेळी रेल्वे स्थानकाच्या परिसरामध्ये आणि फलाटावर भिकारी व बेघरांचा वावर वाढला आहे. या बेघरांनी रेल्वे स्थानकात व परिसरात ठाण मांडल्यामुळे येणारे जाणारे प्रवासी व रेल्वे स्थानकात गाळे असलेले दुकानमालकदेखील हैराण झाले आहेत. यावर रेल्वे पोलीस आणि सिडको सुरक्षा रक्षकांनी कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

नेरूळ रेल्वे स्थानकाच्या बाहेर रात्रीच्या वेळी रेल्वे स्थानक परिसर महिला प्रवाशांकरिता असुरक्षित ठरत आहे. दरम्यान, रेल्वे पोलिसांकडून कोणतीही प्रतिबंधात्मक कारवाई होताना दिसत नाही.

नवी मुंबई शहरातील सर्वच रेल्वे स्थानकात आणि परिसरात भिकारी, बेघर यांनी आपले संसार थाटले आहेत, मात्र नेरूळ रेल्वे स्थानकात रात्री ९ ते १० वाजले की फलाट आणि तिकिट



खडकीजवळ भिकारी व बेघर आपले बस्तान मांडतात. काही जण दिवसभर आपले ठाण मांडून असतात. त्याच ठिकाणी जेवण करून अस्वच्छता करतात. फलाटावरसुद्धा अंथरूण टाकून झोपलेल्याचे दृश्य पाहावयास मिळते.

दरम्यान, आधुनिक काळात नोकरदार महिलांना रात्री उशिरा प्रवास करावा लागतो. रेल्वे डब्यांमध्ये महिलांना सुरक्षा पुरवली जाते, मात्र रेल्वे स्थानक परिसर आणि फलाटावर सुरक्षा रक्षक नसल्याने असुरक्षेची भावना त्यांच्यात आहे. रात्रीचा प्रवास करणाऱ्या महिलांना मद्यपी व गर्दुल्ले यांच्याकडून त्रास होत असतो. याबाबत अनेकदा वेळेअभावी प्रत्यक्ष तक्रार होत नसल्याने रेल्वे पोलीस कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करतात असे प्रवाशांकडून बोलले जात आहे. रेल्वे स्थानकाबाहेर बकालपणा आला असून वेगवेगळे गैरप्रकार घडत असून भांडण तंटे, शिवीगाळ असे अनेक प्रकार सरार्स पणे सुरू असल्याने कारवाईची मागणी होत आहे.

> रेल्वे पोलीस दल आणि सिडको सुरक्षारक्षक अशा घटकाविरोधात वारंवार कारवाई करित असते. नेरूळ रेल्वे स्थानक परिसरात उपद्रव करणाऱ्यांवर कारवाई करावी, असे सिडको प्रशासनास लेखी स्वरुपात कळविले आहे.
>
> –के. एल.सिंग, स्टेशन अधीक्षक, नेरूळ रेल्वे स्टेशन

# पनवेल महापालिकेत मॉक ड्रिल यशस्वी

## अग्निशमन विभागाने दिल्या बचावाच्या सूचना

पनवेल : रामप्रहर वृत्त

आपत्ती काळात नागरिकांना योग्य त्या सूचना मिळाव्यात आणि ते सुरक्षित रहावेत याकरिता मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात येते. मॉक ड्रिल संदर्भातील सूचनेनुसार बुधवारी (दि.७) पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात अग्निशमन विभागामार्फत मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले.

चार वाजता सायरन वाजवत अग्निशमन दलाची गाडी महापालिकेच्या प्रवेश दाराजवळ उभी राहिली आणि बिल्डिंगला आग लागली आहे तातडीने बिल्डिंग करावे, अशा सूचना देत संपूर्ण इमारत रिकामी केली.

इमारतीच्या बाहेर सर्वजण जमा झाल्यानंतर अग्निशमन विभागाच्या वतीने उपस्थितांना आपत्ती काळात काय करावे? काय करू नये? याबाबतचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. छोटे अग्निशमन यंत्र ज्याला बाटला असे म्हणतात.





त्याचा वापर कसा करावा याचेही प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, स्वरूप खारगे, मुख्या लेखा वित्त अधिकारी मंगेश गावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, शहर अभियंता संजय कटेकर, डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड तसेच महापालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# पावसाळापूर्व कामांवर काटेकोर लक्ष; आयुक्तांकडून आढावा

नवी मुंबई : बातमीदार

सद्यस्थितीत सुरू असलेल्या मान्सूनपूर्व कामांना वेग देऊन नाले व गटारे सफाई, वृक्ष छाटणी अशी कामे विहित वेळेत पूर्ण करावीत तसेच पावसाळी कालावधीमध्ये सतर्क राहून सर्व नियंत्रण कक्ष कार्यान्वित राहतील याकडे काटेकोर लक्ष द्यावे, अशा स्पष्ट सूचना नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीवेळी दिल्या.

मान्सूनपूर्व कामांचा विभागनिहाय आढावा घेताना सुरू असलेली कामे व्यवस्थितरित्या होत असल्याबाबत संबधित अधिकाऱ्यांनी नियमित क्षेत्रीय भेटी देऊन लक्ष ठेवावे असे निर्देश आयुक्तांनी दिले. नाले व गटारे सफाई केल्यानंतर काठावर ठेवला जाणारा गाळ पुरेसा सुकल्यावर लगेच उचलून नेण्याची कार्यवाही करण्यात यावी असेही सूचित



करण्यात आले.

रस्ते, पाणी पुरवठा, मलनि:स्सारण, उद्यान अशा विविध विभागांमध्ये देखभाल व दुरुस्तीसाठी नेमण्यात आलेल्या एजन्सीकडून जलद कामे करून घेण्यात यावीत व त्यांनी केलेल्या कामाचा अभिप्राय घेण्याची प्रणाली सक्षमतेने कार्यान्वित करावी असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

धोकादायक तसेच अडथळा आणणाऱ्या वृक्षांची छाटणी करण्यावर भर देऊन रस्त्यावरील दिवाबती सुस्थितीत राहील याकडेही विशेष लक्ष देण्याचे सूचित करण्यात आले. धोकादायक इमारतींची पाहणी करून त्यामधील अतिधोकादायक सी–१ कॅटेगरीच्या इमारतींमधील रहिवास कोणतीही हानी होऊ नये यादृष्टीने बंद करावा तसेच धोकादायक इमारतींची यादी नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावी असेही निर्देश आयुक्तांनी दिले. दरड कोसळण्याचा संभव असणारी ठिकाणे तसेच नाल्यांच्या प्रवाहामध्ये अडथळा आणणाऱ्या झोपड्या तेथून हलवाव्यात अशाही सूचना देण्यात आल्या.

क्षेत्रीय स्तरावरील रस्ते खोदाई, त्यांची दुरुस्ती, बेवारस वाहने हटविणे अशा विभागीय स्तरावरील कामांची जबाबदारी संबधित विभाग अधिकारी व कार्यकारी अभियंता यांची असून त्यादृष्टीने त्यांनी एकत्रितपणे या बाबींवर काटेकोर लक्ष देण्याचे आयुक्तांमार्फत निर्देशीत करण्यात आले.

पावसाळापूर्व कामे सुव्यवस्थित होतील याकडे बारकाईने लक्ष देण्याप्रमाणेच पावसाळा कालावधीतही आवश्यक असलेल्या बाबींची आत्ताच पूर्तता करुन ठेवावी. त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील इतर प्राधिकरणांशी निगडीत पावसाळापूर्व कामे त्यांच्याकडून करुन घेण्यासाठी समन्वय राखावा व पाठपुरावा करावा असे निर्देश महापालिका आयुक्त शिंदे यांनी विभाग प्रमुखांच्या या आढावा बैठकीवेळी दिले.

# कोपरखैरणेत दूषित पाणीपुरवठा

## नागरिक त्रस्त

नवी मुंबई : बातमीदार

नवी मुंबईसारख्या आधुनिक शहरात दूषित पाण्याचा पुरवठा नागरिकांना होत आहे. कोपरखैरणे येथील नागरिकांना हा अनुभव येऊ लागला आहे. त्यामुळे नागरीक त्रस्त झाले आहेत. याबाबत शिवसेनेच्या ऐरोली विभागाच्या महिला जिल्हाप्रमुख शीतल कचरे यांनी आयुक्तांकडे पत्र देऊन समस्या दूर करण्याची मागणी केली आहे.

सेक्टर १६ कोपरखैरणे येथील जय भवानी ओनर्स असोसिएशन आणि दत्तकृपा ओनर्स असोसिएशन येथील रहिवाशांना गेले चार ते पाच महिने सातत्याने दूषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवण्याची शक्यता आहे. आधुनिक शहरता गढूळ पाणीपुरवठा केला जात असल्याने पालिकेच्या यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

यावर याबाबत वारंवार संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून, तक्रार करून अद्यापही कोणतेही ठोस पाऊल उचलले गेलेले नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवलेला असून याबाबत आपण जातीने लक्ष घालून स्थानिक रहिवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी शीतल कचरे यांनी आयुक्तांकडे केली आहे.



## स्व. जनार्दन भगत पुण्यतिथीनिमित्त गव्हाण विद्यालयात अभिवादन

पनवेल : रामप्रहर वृत्त

गव्हाण पंचक्रोशीतील शैक्षणिक क्रांतीचे जनक, सामाजिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्व स्वर्गीय जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७व्या पुण्यतिथी निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, पर्यवेक्षिका शशीकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर आणि इतर अध्यापक, अध्यापिका व सेवक यांचे हस्ते स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांचे हस्ते श्रीफळ वाढवण्यात आले.

या वेळी ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, चारुशीला ठाकूर, द्रौपदी वर्तक, उज्वला म्हात्रे, विद्या पाटील, अस्मिता वर्तक, वरीष्ठ लेखनिक निलेश गोडे, ग्रंथपाल महेश म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, कला शिक्षक गणेश भोईर, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, प्रमोद करावर, ज्युनिअर कॉलेजचे माणिक घरत, जयवंती ठाकूर, अर्चना पाटील तसेच धनाजी ठाकूर, दयानंद खारकर, जनार्दन खैरे व अरुण कोळी आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्व. जनार्दन भगत यांची पुण्यतिथी

खारघर : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.७) स्टाफ वेल्फेअर व ग्रंथालय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने कष्टकऱ्यांचे नेते व थोर समाज सुधारक स्वर्गीय जनार्दन भगत यांची ३७वी पुण्यतिथी साजरी केली.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर यांनी उपस्थित राहून स्वर्गीय जनार्दन भगतसाहेब यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या वेळी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. पूजा लांजेकर व प्रा. रिजवाना मोमीन यांनी केले तसेच दोन्ही समितीतील इतर सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तनुजा सुमन यांनी केले तसेच स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या विषयी विचार मांडले.



# ग्रीन बिल्डिंग कार्यशाळेतून हरित विकासाला चालना

नवी मुंबई : बातमीदार

आजच्या काळात पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचे महत्व जाणून हरित इमारत अर्थात ग्रीन बिल्डींग संकल्पना प्रभावीपणे राबविली जावी व यामधून शाश्वत शहरी नियोजनाला प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'ग्रीन सिटी – ग्रीन बिल्डींग' या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

आयजीबीसीने विकसित केलेली रेटिंग प्रणाली नागरी शाश्वतेमध्ये सुधारणा करण्याच्या संधींचे मूल्यांकन करते. ज्यामध्ये पर्यावरण संरक्षण व संवर्धन, नागरिक कल्याण, भूमी वापराचे नियोजन, नागरी वाहतूक,




पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन, शहर नियोजनातील नाविन्यपूर्णता अशा विविध बाबींचा समावेश होतो. त्यादृष्टीने या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रीन बिल्डींग संकल्पना विशद करीत त्याचा अंगीकार करण्याच्या दृष्टीने सर्वांगीण माहिती देण्यात आली.

या वेळी उपायुक्त शरद पवार यांनी सेवा–सुविधांचा विकास करताना पर्यावरणदृष्ट्या विचार करणे व त्याचा विकास कामांमध्ये अंगीकार करणे ही काळाची गरज असल्याचे सांगत 'पर्यावरणदृष्ट्या शाश्वत पायाभूत सुविधा निर्मिती' हा विषय आजच्या काळात महत्वाचा असल्याचे सांगितले. नैसर्गिक स्त्रोतांचा वापर करतांना आपल्या पुढच्या पिढीसाठीही काही ठेवायचे आहे याचा विचार करणे आवश्यक असून ही आपली सामाजिक जबाबदारी असल्याचे ते म्हणाले. यादृष्टीने कार्यशाळेतील ज्ञानाचा दैनंदिन कामात अंगिकार करणे गरजेचे असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले.

ग्रीन बिल्डींगचे गोल्ड मानांकन असणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारतीचे वास्तुविशारद हितेन सेठी यांनी शाश्वततेची संस्कृती जोपासून आयजीबीसीच्या माध्यमातून हरित शहरी विकासात आपल्या देशाने आघाडी घेतली असून या माध्यमातून पर्यावरणाचा विकास आणि सामाजिक कल्याण हे दोन्ही हेतू साध्य होत असल्याचे सांगितले.

आयजीबीसीच्या वतीने या एकदिवशीय कार्यशाळेत असो. कौन्सिलर गार्गी दास, अस्फिया तैमूर, राजा रेड्डी, विक्रम सिंघा यांनी ग्रीन बिल्डींगविषयक विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या वेळी आयजीबीसी पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त शिंदे यांची भेट घेत त्यांना ग्रीन बिल्डींग विषयक विशेष माहितीपुस्तिका प्रदान केली. या वेळी कार्यकारी अभियंता राजेश पवार उपस्थित होते. नवी मुंबईमध्ये 'ग्रीन बिल्डींग' संकल्पना राबविण्यासाठी या कार्यशाळेतून यशस्वी पाऊल टाकण्यात आले.


वर्ष १२ वे ।। ॐ बाळकृष्णाय नम:।। स्थापना २०१४



श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरू भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर)
**पिताजी**
**श्री. चांगू काना ठाकूर**



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर)
माताजी
**श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर**



श्री समर्थ सद्गुरू दादामहाराज (मुंबई)

## बारावा पुण्यतिथी सोहळा

आपणांस कळविण्यात येते की, आमच्या माताजी स्वानंद सुख निवासी **'श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर'** यांची बारावी पुण्यतिथी मिती वैशाख शु. १२, शके १९४७ **शुक्रवार दि. ०९/०५/२०२५** रोजी **सकाळी १०.०० वा. श्री. स. स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर,** यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथाचे पारायण श्री दासबोध वाचण पर्वणी प्रारंभ, मिती वैशाख शु. १३, **शनिवार दि. १०/०५/२०२५** रोजी दुपारी १२.०० वा. पुण्यतिथी निमित्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधु भगिनीनी उपस्थित रहावे, ही विनंती.

### शनिवार, दिनांक १०/०५/२०२५

| | |
|---|---|
| **सकाळी ०९.०० ते १०.०० – भजन** | नादब्रम्हा भजन मंडळ, रांजणपाडा (खारघर)<br>बुवा : श्री. निवृत्ती बुवा चौधरी,वसंतशेठ पाटील–कोपर,<br>ज्ञानेश्वर म्हात्रे–गव्हाण, गणपत ठाकूर– कोपर, भाऊ ठाकूर,<br>सुरेश ठाकूर–शि.नगर, नितीन ठाकूर– त. पाडा,<br>श्री. महेश पाटील, न्हावा, पखवाज : निलेश पाटील |
| **सकाळी १०.०० ते १२.००** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| **दुपारी १२.०० वाजता** | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

### कार्यक्रमाचे ठिकाण

**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**
**मु.शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५**

### व्यवस्थापक

**देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)**
**शिवाजीनगर– गव्हाण–न्हावेखाडी– कोपर (संचलित)**

### संयोजक

**श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार) आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर**

# माथेरानमध्ये विजेचा लपंडाव

## पुरवठा सुरळीत करण्याची व्यापारी संघटनांकडून मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी पर्यटक येऊ लागले असताना माथेरान महावितरणकडून वारंवार वीज जाण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. विजेचा दाब कमी जास्त होत असल्याने विद्युत उपकरणे नादुरुस्त होत आहेत. मालाचेसुद्धा मोठे नुकसान होत आहे. मागील दोन दिवसांपासून महावितरण कर्मचारी विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी शर्थीचे प्रयन्त करीत असून त्यांना सुद्धा अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

वारंवार वीज पुरवठा खंडित होत असून याचा सगळा परिणाम येथील पर्यटन व्यवसायावर होत आहे यामुळे येथील व्यापारी संघटना, लॉजिंग संघटना तसेच स्थानिक संस्था आक्रमक झाले असून त्यांनी माथेरान अधीक्षक कार्यालय, नगरपालिका कार्यालय व येथील पोलीस प्रशासनाला माथेरान शहराचा वीज पुरवठा सुरळीत सुरू करण्यासाठी निवेदन सादर केले असून २० जूनपर्यंत सुरू राहणाऱ्या पर्यटन हंगामात वीज पुरवठा खंडित होता कामा नये अन्यथा तीव्र आंदोलन पुकारण्यात येईल, असे नमूद केले आहे. माथेरान शहरात मागील अनेक दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू झाला असून ऐन पर्यटन हंगामात वीज जाण्याचे प्रमाण वाढले असल्याने याचा नाहक त्रास नागरिकांना आणि पर्यटकांना सहन करावा लागत आहे.

येथील अनियमित विजपुरावठ्यामुळे शहराच्या पाणी पुरवठ्यावर देखील विपरीत परिणाम होत आहे. येथील स्थानिक नागरिक याबाबत तीव्र संताप व्यक्त करीत असून सर्व संस्था, संघटना यांनी आपल्या लेटर हेड वर माथेरानमधील सर्व शासकीय कार्यालयांना निवेदन दिले असून पर्यटन हंगाम पूर्ण होईपर्यंत वीज पुरवठा सुरळीत राहावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

**माथेरानमध्ये गाडीसाठी परवानगी नसल्याने मशीन घेऊन येण्यास मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच हातगाडीसाठीसुद्धा जादा भाडे मोजावे लागते यासाठी माथेरानवासीयांनी वाहन परवानगी मिळावी याकरिता प्रयत्न करायला पाहिजे. साहित्य वेळेवर मिळाल्याशिवाय येथील महावितरण कर्मचारी काही करू शकत नाहीत.**
**–सचिन आटपाटकर, महावितरण कार्यालय अधिकारी**

**माथेरानमध्ये अनेक समस्यांचा सामना करावा लागत असतो. आता कुठे पर्यटन हंगाम सुरू झाला असून या ठिकाणी विजेची गंभीर समस्या उद्भवत आहे. येथील अधिकारी वर्गाने तसेच महावितरण कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी वर्गानेसुद्धा याठिकाणी येऊन येथील विजेची समस्या पहिली पाहिजे आणि माथेरानमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाला कोणत्या अडचणी येतआहेत हे पाहून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना देखील केली पाहिजे.**
**–राजेश चौधरी, अध्यक्ष, व्यापारी संघटना माथेरान**

# कर्जत रेल्वेस्थानकाच्या मुख्य पुलावर आता तीन नंबर फलाटाचा उल्लेख

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकावरील पुणे दिशेकडे असणाऱ्या मुख्य पुलावर लोकल गाड्यांच्या माहिती करिता फलाट क्रमांक दर्शविण्याकरिता काही वर्षांपूर्वी इंडिकाटर्स बसविले आहेत, मात्र तीन नंबर फलाटाचा कुठेही उल्लेख नव्हता. तीन क्रमांक फलाटाचे इंडिकेटर बसवून प्रवाशांची सोय करावी अशी मागणी होत होती. सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी पाठपुरावा केल्याने कर्जत रेल्वे स्थानकाच्या मुख्य पुलावर तीन नंबर फलाटाचा उल्लेख असलेला इंडिकेटर लावण्यात आला.

कर्जत रेल्वे स्थानकावर लोकल गाड्या फलाट क्रमांक एक, दोन, इएमयू आणि तीन क्रमांकाच्या फलाटावर लोकल गाड्या येत असतात. परंतु खोपोली गाडी करिता फलाट निश्चित नसल्याने कर्जत येथे खोपोली लोकल कधी फलाट क्रमांक दोन वर कधी एक वर तर कधी तीन वर आणली जाते.




कर्जतहून खोपोलीला जाण्या करिता प्रवासी पुणे दिशेकडील असलेल्या पुलावर उभे राहतात जेणे करून खोपोली गाडी ज्या फलाट वर येईल तिकडे जाता येईल. या प्रकारामुळे पुलावर प्रवाशांची गर्दी होते व त्याचा त्रास अन्य प्रवाशांना होतो. खोपोलीकडे जाणारी किंवा खोपोलीवरून मुंबईकडे जाणारी लोकल फलाट क्रमांक तीन वर येणार असली तर तसा उल्लेख नसतो कारण तीन क्रमांकाच्या फलाटासाठी पुलावर इंडिकेटरच उपलब्ध नसल्याने समोर गाडी आल्यावर प्रवाशांची एकच धावपळ होते. या धावपळीत काही जण पडतात. काहींचे सामान पुलावरच राहते. जेष्ठ नागरिक व महिलांना खूप त्रास होतो. कधी कधी गाडीही सुटते.

दररोज प्रवास करणाऱ्या दर्शना सुनील शेट्ये यांनी ही बाब निदर्शनास आणून दिली व लवकरात लवकर तीन नंबर फलाटाचा इंडिकेटर बसवावा. अशी मागणी केली होती. सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी याबाबत रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला. सुरुवातीला तीन नंबर फलाटचा उल्लेख पुलावर आहे. असे सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. तीन नंबर फलाटाचा उल्लेख पुलावर आहे, मात्र तो पूर्वे कडील पुलावर आहे. हे ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर मुख्य पुलावर तीन नंबर फलाटाचा उल्लेख असलेला इंडिकेटर बसविण्यात आला. यामुळे प्रवाशांची सोय होऊन धावपळ थांबली आहे.

## निवडक



### कामगार सुरेश जाधव सेवानिवृत्त

**धाटाव :** सुरेश काशिनाथ जाधव हे वयाच्या ५८व्या वर्षी निलिकॉन कंपनीतील कामगार सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचा सेवा निवृत्त सोहळा अत्यंत उत्साहात साजरा झाला. त्यांच्या सेवा निवृत्त सोहळ्यास उपस्थित राहून भारतीय जनता पक्षाचे रोहा तालुका अध्यक्ष अमित हरिभाऊ घाग, त्यांचे बंधु पत्रकार राजेंद्र जाधव, युनियन अध्यक्ष भरत कोतवाल, माजी पंचायत समिती उपसभापती अनिल भगत साहेब, जेष्ठ नेते शंकरराव भगत साहेब संपूर्ण निलिकॉन कामगार कमिटी लांढर गाव सगे सोयरे, आप्तेष्ट परिवार उपस्थित राहून त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



**नागोठणे :** भाजप नेते किशोर म्हात्रे यांचा पुतण्या व रिलायन्स नागोठणेचे कर्मचारी नथुराम म्हात्रे यांचा कनिष्ठ पुत्र सचिन व पालखार (आमटेम, ता. पेण) येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गणेश म्हात्रे यांची सुकन्या सायली यांचा विवाह नुकताच झाला. यानिमित्त भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पेण तालुका माजी अध्यक्ष गंगाधर पाटील, नेते आनंद जाधव व म्हात्रे कुटुंबीय उपस्थित होते.

# कशेडी महामार्ग पोलीस टॅपचे स्थलांतरण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्ग क्रमांक १७ वर कशेडी घाटात गेल्या तीस वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत असलेले कशेडी महामार्ग पोलीस मदत केंद्र आता कशेडी गाव हद्दीतील नवीन मुंबई–गोवा महामार्ग क्रमांक ६६ वरील भुयारी मार्गालगत नवीन वास्तूत स्थलांतरित करण्यात आले आहे. कशेडी बंगला ग्रामस्थांनी पोलिस कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



मुंबई–गोवा महामार्गाचे चौपदरीकरणादरम्यान नवीन महामार्ग भोगाव हद्दीतून कशेडी भुयारी मार्गे जात आहे. कशेडी घाटातील यापूर्वीपासून कशेडी महामार्ग पोलीस मदत केंद्र नवीन महामार्गावर कशेडी गाव हद्दीत हॉटेल अनुसया जवळ शनिवारी स्थलांतरित करण्यात आले आहे.

कशेडी पोलीस टॅप स्थलांतरित झाल्याने कशेडी ग्रामस्थांकडून कशेडी टॅपचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण धडे, पोलीस नाईक शंकर कुंभार, पोलीस हेडकॉन्स्टेबल विजय मोरे, राजन माजळकर, गजानन रामागडे, अनिकेत मोहिते, संजय चिकणे, पोलीस मित्र महेश रांगडे आदीना कशेडी बंगलातील ग्रामस्थांकडून शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी कशेडीचे पोलीस पाटील संदेश दरेकर, प्रवीण मोरे, मुकुंद मोरे, निलेश अजगनकर, दिलीप दरेकर, सुरेश दरेकर, विष्णू सकपाळ यांनी उपस्थित होते.

# 'शिक्षणाचा अधिकार कायद्याचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई होणार'

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिक्षणाचा अधिकार कायद्याचा गैरवापर करून शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असे रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी म्हटले आहे. त्या सीईओपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर मंगळवारी (दि.६) कार्यालयातील सभागृहात पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होत्या.



रायगड जिल्ह्यात शिक्षणाचा अधिकार कायद्याचा गैरवापर करून काही पालकांनी आपल्या पाल्यांचा शाळेत प्रवेश घेतला आहे. याबाबत तक्रारी करूनदेखील शिक्षणाधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नाही, ही बाब पत्रकारांनी सीईओ नेहा भोसले यांच्या निदर्शनास आणून दिली. त्या वेळी त्यांनी या प्रकरणात लक्ष घालू आणि शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत जेवढे प्रवेश देण्यात आले आहेत त्यांची माहिती घेऊन जर कुणी गैरवापर केल्याचे आढळल्यास त्यांचे प्रवेश रद्द करण्याची कारवाई केली जाईल, असे सांगितले.

पिण्याच्या पण्याची समस्या, ग्रामीण स्वच्छता या या बाबींना प्राधान्य देण्यात येईल. शाळांच्या इमारतीची डागडुजी, जलयोजनांची दुरूस्ती केली जाईल. जलजीवन योजना पूर्ण करण्यात येतील, असे सीईओ भोसले म्हणाल्या.

# कर्जत तालुक्यात बारावीच्या परीक्षेत साक्षी मते सर्वप्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

आज बारावी परीक्षेचा निकाल लागला. यामध्ये नेरळ विद्या मंदिर उच्च माध्यमिक विद्यालयातील वाणिज्य शाखेत शिकणारी साक्षी दत्ता मते हिने ९४.५० टक्के गुण मिळवता तालुक्यात प्रथम क्रमांक पटकवला. याच कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेत शिकणारी लीना मधुकर म्हस्कर ९३ टक्के गुण मिळवून तालुक्यात द्वितीय तर

अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील रिया रामदास गोपाळे हिने ९२. ३३ टक्के गुण मिळवत तालुक्यात तिसरा क्रमांक मिळवला. तालुक्यातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये मुलींनीच प्रथम क्रमांक पटकावला आहे.



साक्षी मते सातवीमध्ये शिकत असताना तिच्या वडिलांचे छत्र हरवले. त्यानंतर तिच्या आईने तिचे, तिच्या भावाचे तसेच आजी – आजोबांचा सांभाळ करीत मुलांना शिक्षण दिले. साक्षीने बारावी परीक्षेत तालुक्यात सर्वप्रथम येऊन आईच्या कष्टाचे चीज केले.

# माणगाव येथील तटकरे कॉलेजच्या विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

माणगाव येथील माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संकुलातील द.ग. तटकरे कनिष्ठ महाविद्यालयाच्या बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर वाणिज्य शाखेचा ९७.१४ टक्के इतका लागला आहे. विशेष म्हणजे या कॉलेजमध्ये या दोन्ही शाखा इंग्रजी माध्यमाच्या आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले जात आहे.

या कॉलेजमधील इयत्ता बारावी विज्ञान शाखेत प्रथम तलसुलकर महेक अ.जब्बार (४२३ गूण ) ७०.५० टक्के, द्वितीय मोहतो योगेश वासुदेव ( ४१७ गूण) ६९.५० तृतीय गांगण कौस्तुभ राहुल (४१४ गूण) हे अव्वल क्रमांकांनी उत्तीर्ण झाले असून या विज्ञान शाखेचा निकाल दरवर्षी प्रमाणे यंदाही १०० टक्के लागला आहे.

याचबरोबरीने वाणिज्य शाखेचा निकाल ९७.१४ टक्के इतका लागला असल्याने या शैक्षणिक संकुलात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या बारावी वाणिज्य शाखेत प्रथम मौले चांदनी विश्वास (५३४ गूण) ८९ टक्के, द्वितीय हरणेकर म. जरीर अब्दुल्ला ( ५०६ गूण) ८४.३३ टक्के, तृतीय अंबानी अमृता मोहन कुमार ( ५०४ गूण) ८४ टक्के चतुर्थ छेडा रिद्धी राजू ८३ टक्के, पंचम मानकर अनघा सागर ७५.३३ टक्के असे गूण मिळवले आहेत.

या यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा भाई गांधी, शाळा समिती चेअरमन नरेंद्र गायकवाड अरुण पवार, संचालक नितीन बामगुडे, मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या चेअरमन निकीता साबळे, विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ, श्रीमती विठाबाई मारुती गोगावले नर्सिंग कॉलेजचे चेअरमन डॉ. गौतम राऊत, डॉ. आबासाहेब पाटणकर, प्राचार्य डॉ. बी.एम. खामकर सर, प्राध्यापक यांनी केले.

# रानमेव्याचा गोडवा; खवय्यांना पर्वणी

**माणगाव : प्रतिनिधी**

उन्हाळा म्हणजे रान फळांची मेजवानी घेऊन येणारा ऋतू असतो. इतर कोणत्याच ऋतूत न मिळणारी फळे, फुले खास या ऋतूत मिळतात. यामध्ये जांभळे, करवंदे, आठुरणी, कोकम इत्यादी फळांचा समावेश असतो. उन्हाळी दिवसात तयार होणारी ही फळे म्हणजे खवय्यांसाठी चविष्ट असा गोडवा असतो.



उन्हाळ्याची तीव्रता वाढल्यानंतर आंबा, काजू इत्यादी फळांवरोबर सर्वसामान्यांच्या आवडीची असलेली खास अशा गोडव्याची फळे म्हणजे जांभळे आणि करवंदे होत. रानाची मैना म्हणून करवंदांच्या उल्लेख केला जातो. कोकणातील डोंगर रांगात दिसणाऱ्या लहान–मोठ्या विस्तीर्ण अशा करवंदाच्या जाळी म्हणजेच विविध पशुपक्ष्यांसाठी निवारा तर असतोच त्याबरोबरीने उन्हाळी दिवसात हिरव्या पानातून डोकावणारी काळाकभिन्न करवंदांची फळे सर्वांनाच आवडतात. पूर्ण पक्व झालेली ही फळे वरून काळकभिन्न असतात व आतून लालसर रंगांचा गर व काही बिया असतात. आंबट–गोड चवीला लागणारी ही करवंदांची फळे म्हणजे खास उन्हाळ्यातील रानमेवा म्हणून प्रसिद्ध आहेत.

करवंदाची चव फारच न्यारी असते. त्यांपासून सुगरणी चविष्ट चटण्या, लोणची ही तयार करतात. करवंदांच्या उपयोग टोपल्या, सुपाना लेप देण्यासाठी म्हणुन करतात पिकलेली करवंदे वाळवून पुढील दिवसांसाठी खाण्यासाठी ठेवली जातात. सुकलेल्या या करवंदांचा स्वाद व चव अगदी वेगळाच स्वादिष्ट असतो.

करवंद प्रमाणे डोंगर भागात जांभळीची झाडे मोठ्या प्रमाणात आढळून येतात. उन्हाळी दिवसात तयार होणारे तुरट गोड चवीची फळे खायला चविष्ट असतात. जांभळाचे आयुर्वेदात उपयोग सांगितले आहेत. जांभळे मधुमेहींसाठी खास औषधी म्हणून आहेत. हाडकी, मांसवाली, मनुकांच्या आकाराची तर काही टपोरी असणारी जांभळे खवय्यांसाठी पर्वणी असते. उन्हाळी दिवसात तयार होणाऱ्या या जांभळांना चांगली मागणी असून १५० ते २०० रुपये किलोप्रमाणे ती विकली जातात.

या रांमेव्याव्याच्या विक्रीतून ग्रामीण भागातील अनेक महिलांना हक्काचा रोजगार मिळतो. करवंदे १० ते २० रूपये वाटा विकला जातो. पळसाच्या पानात करवंदाची विक्री केली जाते.रान मेव्यानी भरलेला करवंदाचा द्रोण दिसायला सुंदर व आकर्षक असतो.कोकम ५० ते १०० रुपये किलोने विकला जातो. जांभळे २५० ते ३०० रुपये प्रति किलो दराने विकली जातात.

इतर फळेही रानावनात झाडी झुडपात मिळतात. उन्हाळ्यातील रान मेव्याचा हा गोडवा खवय्यांच्या पसंतीचा असून याची चव वर्षभर मनात रेंगाळत राहते.

**रान फळांना विशिष्ठ गोडवा असतो. हा गोडवा खास उन्हाळी दिवसात चाखायला मिळतो कोकणात खास करून वैशिष्ठ्य पूर्ण असलेली रान फळे आहारात उपयुक्त असून आरोग्यासाठी उपयुक्त आहेत.यांच्या विक्रीतून ग्रामीण भागातील महिलांना हक्काचा रोजगार मिळतो. गृहिणी रानमेव्यातून विविध पदार्थ तयार करतात.**
**–नीलिमा मोंडे, गृहिणी**

# मुरूडच्या अंजुमन कॉलेजचा १०० टक्के निकाल

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील अंजुमन इस्लाम जंजिरा एग्री हायस्कुल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, कॉमर्स या शैक्षणिक संस्थेच्या सायन्स शाखेचा १०० टक्के तर कला शाखेचा ८८.६८ टक्के निकाल लागलेला आहे. विशेष म्हणजे यंदाच्या निकालात मुलींनी परत एकदा बाजी मारली आहे. या दोन्ही शाखेचा या वर्षी समाधानकारक निकाल लागला.

विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल लागला आहे. यात प्रामुख्याने प्रथम अफरीन रियाज दुपारे (७९.८३ टक्के), द्वितीय क्रमांक. इफ्फा इस्माईल कारभारी (७८.८३%) तृतीय क्रमांक.विधी उत्तम जैन (७३.३३ टक्के) यांनी बाजी मारली आहे.



तर कला शाखेचा ८८.६८ टक्के निकाल लागला असून प्रामुख्याने प्रथम रिदा रियाज किल्लेकर (७३.८३ टक्के), द्वितीय सुमय्या अय्याज चोगले (६६.८३ टक्के), तृतीय फहीम कुळसूम मुबीन (६६.१७ टक्के), तृतीय जुहा रिदवान जमादार (६६.१७ टक्के) यांनी चमकदार कामगिरी केली.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याबद्दल शाळा समिती चेअरमन अब्दुल रहीम कबले, शाळा समिती सदस्य तसेच प्रचार्य वसीम सतारेकर, माजी प्राचार्य जाहिद गोठेकर सर, पर्यवेक्षक इशतीयाक सर, व लेक्चरर अन्सार सर, सर्व शिक्षक वृंद यांनी सर्व विद्यार्थ्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

मुरूड शहरातील अंजुमन इस्लाम जंजिरा एग्री हायस्कुल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्सचा निकाल मुरुड तालुक्यातून उत्कृष्ट लागला आहे. यामुळे सर्व शैक्षणिक क्षेत्रातून या शाळेचे कौतुक व प्रशंसा होत आहे.

# वाशी सरपंच संदेश ठाकूर यांची जिल्हाध्यक्षपदी निवड

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वाशी ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच संदेश शंकर ठाकूर यांची राष्ट्रीय प्रधान मुखिया सरपंच संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने रायगड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पंचायत राज व्यवस्थेच्या सशक्तीकरणासाठी, ग्रामविकासाठी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्कर्षासाठी



त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेऊन ही निवड करण्यात आली.

सरपंच संदेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली वाशी ग्रामपंचायतीने घनकचरा व्यवस्थापन, तलाव सुशोभीकरण, स्वच्छता अभियान तसेच माझी वसुंधरा ५.० या उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या योजनाबद्ध आणि विकासाभिमुख कामांमुळे वाशी विभागातील स्वच्छता, पर्यावरण व ग्राम विकासाला सकारात्मक चालना मिळाली आहे.

या कार्याची दखल राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके, प्रदेशाध्यक्ष प्रमोद सांगोले व महासचिव नितिन ताथोड यांनी घेतली असून, त्यांच्या संमतीने संदेश ठाकूर यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने वाशी विभागासह पेण तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गुजरातचा मुंबईवर थरारक विजय



**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेत मंगळवारी मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यात वानखेडे स्टेडियमवर झालेला सामना पावसामुळे गाजला. दुसर्‍या डावात सातत्याने पावसाचा व्यत्यय आला. त्यामुळे सामना कधी मुंबईच्या, तर कधी गुजरातच्या बाजूने झुकत होता, पण अखेर गुजरातने शेवटच्या चेंडूवर हा रोमांचक सामना जिंकला.

या विजयासह गुजरातने १६ गुण मिळवत पॉईंटस् टेबलमध्ये अव्वल क्रमांक मिळवला, तर सलग सहा विजयानंतर मुंबईला पराभवाचा धक्का बसला. त्यामुळे आता मुंबई १२ सामन्यांनंतर १४ गुणांसह चौथ्या क्रमांकावर घसरली आहे. पावसामुळे गुजरातला शेवटच्या षटकात १५ धावा करण्याचे आव्हान होते. दीपक चहरच्या या षटकातील पाच चेंडूंत राहुल तेवतिया अणि गेराल्ड कोएत्झी यांनी १४ धावा काढल्या. शेवटच्या चेंडूवर अर्शद खानने विजयी धाव घेतली. हार्दिक पंड्याचा थ्रो चुकला आणि मुंबईचे दोन गुण हुकले.

मुंबईने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १५५ धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देताना गुजरात संघ फलंदाजीला उतरल्यानंतर त्यांनी फॉर्ममध्ये असलेल्या साई सुदर्शनची विकेट दुसर्‍याच षटकात गमावली. पहिल्या सहा षटकांत गुजरात डकवर्थ लुईसनुसार मागे होते. बटलरला १२व्या षटकात अश्वनी कुमारने ३० धावांवर बाद केले. तरी इम्पॅक्ट सब्स्टिट्यूट म्हणून मैदानात उतरलेल्या शेर्फन रदरफोर्डने आक्रमक खेळ केला. त्यामुळे गुजरातने समीकरण बदलले, पण १४व्या षटकानंतर पावसाला अखेर सुरुवात झाली आणि अंपायर्सनी सामना थांबवला. सामना थांबला तेव्हा गुजरातने १४ षटकांत २ बाद १०७ धावा केल्या होत्या.

पाऊस थांबल्याने खेळ पुन्हा सुरू झाला. बुमराहच्या षटकात चौकार मारल्यानंतर पुढचा चेंडूही तसाच मारण्याचा मोह शुभमन गिलला नडला आणि त्याच्या दांड्या उडाल्या. गिलने ४६ चेंडूंत ४३ धावा केल्या. येथून पुढे मुंबईने सामन्यावर पकड मिळवली. पुढच्या षटकात धोकादायक शेर्फन रदरफोर्डला बोल्टने पायचित केले. त्याने १५ चेंडूंत २८ धावा केल्या. बुमराहने आपल्या शेवटच्या षटकात शाहरूख खानचा (६) त्रिफळा उडवला. अश्वनी कुमारने राशीद खान (२) याला पायचित केले. १८वे षटक संपल्यानंतर पावसाला पुन्हा सुरुवात झाली.

यानंतर सामना साडेबारा वाजता सुरू झाला, पण एक षटक कमी करून गुजरातला एका षटकात १५ धावांचे आव्हान देण्यात आले. दीपक चहरकडे गोलंदाजीची धुरा होती, तर राहुल तेवतिया स्ट्राईकवर होता. त्याने पहिल्याच चेंडूवर चौकार मारला. दुसर्‍या चेंडूवर एक धाव आली. तिसर्‍या चेंडूवर स्ट्राईकवर आलेल्या गेराल्ड कोएत्झीने षटकार ठोकून सामना मुंबईपासून दूर नेला. चौथ्या चेंडूवर एक धाव आली, परंतु हा नोबॉल ठरला. फ्री हिटवर फक्त एकच रन निघाली. सामना बरोबरीत आला. पाचव्या चेंडूवर कोएत्झी बाद झाला. त्यामुळे शेवटच्या चेंडूवर एक धाव हवी होती. अर्शद खानने चेंडू जमिनीवरून टोलवला तो हार्दिकच्या हातात गेला, परंतु पुरेसा वेळ असतानाही हार्दिक नीट थ्रो करू शकला नाही. अर्शदने विजयी रन पुरी केली आणि गुजरातला महत्त्वपूर्ण दोन गुण मिळाले.

# अस्मिता महिला पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्र संघ उपविजेता



**पाली : प्रतिनिधी**

क्राइस्ट अकॅडमी स्कूल, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे खेलो इंडिया अस्मिता पिंच्याक सिलॅट महिला स्पर्धेचे आयोजन स्पोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या मान्यतेने महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनने केले होते. या स्पर्धेत ३० राज्यातील ३६४ खेळाडूंनी सहभाग घेतला.

स्पर्धेत पाच सुवर्ण, दोन रौप्य, दोन कांस्यपदके मिळवून मध्य प्रदेश संघाने पहिला क्रमांक पटकावला. चार सुवर्ण, तीन रौप्य कांस्यपदकांसह महाराष्ट्र संघ द्वितीय; तर तीन सुवर्ण, तीन रौप्य, सात कांस्यपदके मिळवून आसाम संघ तिसर्‍या स्थानी राहिला.

बक्षीस समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार नरेश म्हस्के, अकॅडमी स्कूल मॅनेजिंग डायरेक्टर फादर जेसन क्राइस्ट, इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले, शिवसेना जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, महिला आघाडी नवी मुंबई प्रमुख शितल कचरे, इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे सेक्रेटरी जनरल, तारिक जरगर, महाराष्ट्र सिलंबम असोसिएशनचे सदस्य सचिन शिंदे तसेच विजयानंद माने, मिथुन जोशी उपस्थित होते.

सर्व विजेत्या खेळाडूंना इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे अध्यक्ष येवले, जनरल सेक्रेटरी सुरेंद्रप्रताप सिंह, महाराष्ट्र खजिनदार मुकेश सोनावणे तसेच तृप्ती बनसोडे, धनंजय जगताप, साहेबराव ओहोळ, अरविंद शिर्के, नागेश बनसोडे, आकाश धबाडगे, अमोल कदम महाराष्ट्र यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# हार्दिक पांड्यासह मुंबई संघाला दंड



**मुंबई : प्रतिनिधी**

गुजरात टायटन्सकडून शेवटच्या चेंडूवर झालेल्या पराभवानंतर मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्याला मोठा धक्का बसला. पावसामुळे व्यत्यय आलेला सामना मुंबईने शेवटच्या चेंडूवर गमावला. या सामन्यातील पराभवानंतर बीसीसीआयने हार्दिकच्या संघाला स्लो ओव्हर रेटमुळे दंड ठोठावला. फक्त हार्दिकच नाही तर संपूर्ण टीमला कारवाईचा दणका बसला आहे.

मुंबई संघाने १४७ धावांचा बचाव करताना (डीएलएसनुसार सुधारित लक्ष्य) निर्धारित वेळेत संपूर्ण षटकांचा कोटा पूर्ण केला नाही. याबद्दल बीसीसीआयने एमआयला स्लो ओव्हर रेटसाठी दोषी ठरवले. यासह त्यांचा कर्णधार हार्दिक पांड्याला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावला. चालू हंगामात मुंबई संघाने दुसर्‍यांदा स्लो ओव्हर रेटची चूक केली आहे.

बीसीसीआयच्या निवेदनानुसार पांड्याच्या संघाने या हंगामात दुसर्‍यांदा स्लो ओव्हर रेटची चूक केली आहे. त्यामुळे आयपीएलच्या आचारसंहितेनुसार पांड्यावर २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे तसेच प्लेइंग-११ मधील इतर खेळाडूंवर, इम्पॅक्ट प्लेयर आणि कनकशन सब्स्टीट्यूट खेळाडूंवर प्रत्येकी सहा लाख रुपये आणि मॅच फीच्या २५ टक्के दंड आकारण्यात आला आहे.

# उन्हाळी क्रीडा कौशल्य व व्यक्तिमत्व विकास शिबिर प्रशिक्षण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून जिल्ह्यातील मुला-मुलींना विविध खेळ माहिती व्हावे तसेच या खेळांच्या माध्यमातून चांगले खेळाडू तयार व्हावे याकरिता दीड महिना मोफत उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथारे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

उद्घाटन समारंभास माध्यमिक शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, प्रशिक्षक पुरुषोत्तम पिंगळे, आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी, यतिराज पाटील, जगदीश मरागजे, सामाजिक कार्यकर्ते रिकी अगरवाल, धनंजय कवठेकर, दिव्या मोकल, नागेश शिंदे, ऋषिकेश राऊत, आशिष पाटील, भरत प्रल्हाद गुरव, प्रियांका गुंजाळ, संतोष प्रभाकर जाधव, वीरेंद्र पवार, माधवी पवार, भक्ती तिवारी, देवीदास महादेव पाटील, हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, भरत गुरव, संदीप गुरव, तुषार मढवी यांच्यासह प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेले बहुसंख्य खेळाडू व पालक उपस्थित होते.



भारताला ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पहिले पदक प्राप्त करून देणारे खशाबा जाधव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी शिवथरे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून अशा प्रकारच्या शिबिरांमधून ऑलम्पिक खेळाडू तयार व्हावा अशा शुभेच्छा दिल्या.

**विविध खेळांचा समावेश**

*दीड महिना चालणार्‍या या प्रशिक्षण शिबिरात लगोरीसारख्या पारंपरिक खेळापासून आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या नेमबाजीसारख्या विविध खेळाचे प्रशिक्षण तंत्रशुद्ध पद्धतीने देण्यात येणार आहे. साधारणतः १५०पेक्षा अधिक प्रशिक्षणार्थींचा सहभाग या शिबिरात आहे.*

शिक्षणासोबत खेळाची जोडणी आजच्या स्पर्धेच्या युगात गरजेचे आहे तसेच खेळामध्ये राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्य प्राप्त करणार्‍या खेळाडूंना गुणपत्रिकेत गुणांची जोड मिळत असल्याने अशा शिबिरांचे आयोजन ही विद्यार्थ्यांना मिळालेली सुवर्णसंधी आहे, असे प्रतिपादन रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी महारुद्र नाळे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले. जगदीश मरागजे यांनी सूत्रसंचालन केले. त्यानंतर नेमबाजी, कराटे, तायक्वांदो, लाठीकाठी, लगोरी यांसारख्या विविध खेळांची प्रात्यक्षिके झाली व मान्यवरांनीदेखील बॅडमिंटन खेळून खेळाडूंना प्रोत्साहित केले.

# शुभमन गिलने अय्यरला टाकले मागे



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल उत्तम फॉर्ममध्ये आहे. आतापर्यंत त्याने आपल्या संघासाठी चांगली कामगिरी केली आहे. मुंबईविरुद्ध सामन्यात शुभमन गिलने ५०० धावांचा टप्पा ओलांडला. या कामगिरीसह त्याने पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यरला मागे टाकले. आयपीएलच्या एका हंगामात सर्वाधिक धावा करणार्‍या युवा कर्णधारांच्या यादीत शुभमन गिल दुसर्‍या स्थानावर पोहचला. या यादीत आरसीबीचा माजी कर्णधार विराट कोहली पहिल्या स्थानावर आहे.

कर्णधार म्हणून आयपीएलच्या एका हंगामात सर्वाधिक धावा करणारा विराट कोहली हा सर्वात तरुण फलंदाज आहे. विराटने २०१३मध्ये पहिल्यांदाच आरसीबीचा कर्णधार बनला तेव्हा त्याने त्याच्या संघासाठी ६३४ धावा केल्या. त्या वेळी विराट कोहलीचे वय २४ वर्षे १६८ दिवस होते. या वर्षी शुभमन गिलने कर्णधार म्हणून आयपीएलमध्ये ५०० धावांचा टप्पाही ओलांडला. शुभमन गिलचे वय २५ वर्षे २४० दिवस आहे.

२०२०च्या आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्व करताना श्रेयस अय्यरने ५१९ धावा केल्या. श्रेयसने ५०० धावा पूर्ण केल्या, तेव्हा तो २५ वर्षे ३४१ दिवसांचा होता. या यादीत शुभमन गिल आता दुसर्‍या स्थानावर पोहचला आहे. त्याने श्रेयस अय्यरला मागे टाकले आहे.

# ऑपरेशन सिंदूरनंतर क्रिकेटपटूंनी केले भारतीय लष्कराचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीर या दोन्ही ठिकाणी भारतीय लष्कराने ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारे दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त केले आहेत. लष्कराने केलेल्या या यशस्वी कारवाईनंतर भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, शिखर धवन आणि हरभजन सिंग यांनी भारतीय सैन्याचे कौतुक केले आहे.

सचिन तेंडुलकरने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, एकतेत ताकद आहे आणि त्या ताकदीला सीमा नाही. भारताची खरी ढाल म्हणजे भारताचे नागरिक आहेत. दहशतवादाला या भूमीत स्थान नाही. आम्ही एकजुट आहोत.

दुसरीकडे भारताचा माजी सलामीवीर शिखर धवनने इन्स्टाग्रामवरील त्यांच्या पोस्टमध्ये ऑपरेशन सिंदूरच्या यशावर प्रकाश टाकणारा एक फोटो शेअर केला आणि त्याला, जे म्हटले होते, ते करून दाखवले. न्याय मिळाला. भारत माता की जय!, असे कॅप्शन दिले आहे. शिखर धवनची ही पोस्ट अनेकांना भावली असून यावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया येत आहेत.

भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंगनेही ऑपरेशन सिंदूरसाठी भारतीय सैन्याचे कौतुक केले आहे. एक्सवरील पोस्टमध्ये तो म्हणाला की, जय हिंद. ऑपरेशन सिंदूर हे पहलगाममध्ये आपल्या निष्पाप बांधवांच्या क्रूर हत्येला भारताने दिलेले उत्तर आहे.

# महाराष्ट्राचा रिलेमध्ये ‘सुवर्ण’ धमाका

**गया : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी सलग तिसर्‍या दिवशी सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत पदकांची लयलूट केली. महाराष्ट्राने मुलांच्या चार बाय मेडले रिले स्पर्धेत सुवर्णपदकाचा धमाका केला. याचबरोबर धरीती अहिरवालने रौप्य, तर वेदान्त तांदळे व अलेफिया धंसुरा यांनी कांस्यपदके जिंकली.

गया शहरातील ‘बीआयपीएआरडी’चया जलतरणात तलावावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अर्नव कडू, शुभम जोशी, वेदांत तांदळे व अथर्व संकपाळ या चौकडीने मुलांच्या चार बाय मेडले रिले स्पर्धेत ३ मिनिटे ५७.८९ सेंकद वेळेसह सुवर्णपदकाला गवसणी घातली. कर्नाटकने रौप्य, तर आंध्र प्रदेशच्या संघाने कांस्यपदक जिंकले.

# इंडियन आयडॉलचा गायक आयपीएलमध्ये पंच



**पुणे : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ आता प्लेऑफकडे वाटचाल करत आहे. यंदाच्या लीगमध्ये एक खेळाडूंसह एक पंच सगळ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. आयपीएलसाठी पहिल्यांदाच निवड झालेल्या सात नवीन पंचांमध्ये त्याचा समावेश आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या पंचाने आधीच गायक म्हणून खूप प्रसिद्धी मिळवली आहे आणि इंडियन आयडलसारख्या मोठ्या टीव्ही रिलिटी शोमध्ये आपली छाप सोडली आहे.

पुण्याचा रहिवासी पराशर जोशी याने आपल्या अनोख्या प्रवासाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. २००८मध्ये इंडियन आयडॉलच्या चौथ्या पर्वात गायक म्हणून सहभागी झालेला पराशर आता आयपीएलमध्ये पंच म्हणून चमकत आहे. त्याने ५ एप्रिल रोजी चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामन्यातून आयपीएल पंच म्हणून पदार्पण केले.

पराशरने पुण्यातील क्लब क्रिकेटमध्ये खेळताना संगीताची आवड जोपासली. या दोन्ही क्षेत्रांत त्याने नाव कमावले. २०१५मध्ये बीसीसीआयच्या पंचांच्या पॅनेलमध्ये त्याची निवड झाली आणि त्याने रणजी ट्रॉफी, दुलीप ट्रॉफी आणि २०२४च्या वूमन्स प्रीमियर लीगमध्येही पंचगिरी केली. आयपीएल २०२५साठी बीसीसीआयने सात नवीन पंचांना संधी दिली, त्यापैकी पराशर एक आहे.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com